


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९१ ■ गुरूवार, दि. ३० एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# बच्चू कडू यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

## शिवसेनेची भाजपला शह देण्याची तयारी

प्रतिनिधी ३० एप्रिल



**मुंबई:** 'प्रहार'चे आक्रमक नेतृत्व आणि सामान्यांचे कैवारी म्हणून ओळखले जाणारे बच्चू कडू यांनी आज अधिकृतपणे आपल्या राजकीय प्रवासाचे नवे पान उलटले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बच्चू कडू यांनी आज शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीचा मुहूर्त साधत, 'शेतकरी आणि दिव्यांगांच्या हक्कासाठी हा धनुष्यबाण आम्ही मजबुतीने पेलू,' अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या पक्षप्रवेशासोबतच बच्चू कडू यांना शिवसेनेकडून विधान परिषदेची उमेदवारी जाहीर करण्यात आली. या प्रवेशातून शिवसेना भाजपला अमरावती नव्याने शह देण्याच्या तयारीत आहे.

शिवसेना प्रवेशावेळी बोलताना बच्चू कडू यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचे स्मरण केले. ते म्हणाले की, 'तुकडोजी महाराजांनी आपली 'ग्रामगीता' शेतकऱ्यांना अर्पण केली होती. आज त्यांच्याच जयंतीदिनी आम्ही शेतकऱ्यांच्या हितासाठी शिवसेनेसोबतचा प्रवास सुरू करत आहोत. माझी राजकीय सुरुवात शिवसेनेतूनच झाली होती आणि आता पुढील कार्यही याच पक्षात राहून अधिक प्रभावीपणे करेन.'

केवळ आमदारकीच्या पदासाठी नाही, तर मुद्द्यांची लढाई अधिक मजबूत झाली पाहिजे. शिंदे साहेबांचा स्वभाव सेवाभावी आहे. ते मुख्यमंत्री असताना रात्री २ वाजता सुद्धा वर्षा बंगल्याची दारे उघडी होती. देशातील ऐतिहासिक निर्णय दिव्यांग मंत्रालय देण्याचे काम केले. कर्जमाफीत घेतलेला पुढाकार निश्चितच शेतकऱ्यांना दिलासा देणारा आहे. म्हणून केवळ पद नाही, तर विचार जुळणे महत्त्वाचे असते. विचारासोबत कर्तृत्व महत्त्वाचे असते. त्या दोन्ही गोष्टी आम्ही शिंदे साहेबांत पाहतो.

### 'प्रहार' सामाजिक कार्यासाठी, राजकारण शिवसेनेचे

प्रहार ही एक सामाजिक संघटना म्हणून पावले टाकेल, पण राजकारण मात्र शिवसेनेचे मजबूत केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिवसैनिक उभा करू. छत्रपती शिवरायांनी जो विचार ठेवला होता, हे राज्य रयतेचे आहे. ते रयतेचे राज्य पुन्हा निर्माण व्हावे आणि त्या सर्वोच्च गादीवर आम्हाला पुन्हा शिंदे साहेब दिसावेत यासाठी आमचे प्रयत्न राहणार आहेत. फक्त आमदारकीसाठी आम्ही निर्णय घेतलेला नाही. आमचे मुद्दे मोठ्या पक्षाच्या हाती जावे आणि हा अजेंडा आम्ही भगवा झेंडा राबवणार आहोत. जो अजेंडा प्रहारचा पांढरा झेंडा घेऊन राबवत आहोत, आता झेंडा बदलला असला, तरी अजेंडा कायम आहे. तोच अजेंडा घेऊन पुढे जाऊ, असे बच्चू कडू म्हणाले.

### शिंदेंचा बच्चू कडूंना दिला महत्वाचा शब्द

बच्चू कडू यांचे एकनाथ शिंदे यांनी पक्षात स्वागत केले. ते म्हणाले, 'बच्चू कडू यांच्यासारखा कडवट कार्यकर्ता, सर्वसामान्यांचा नेता, दिव्यांगासाठी झटणारा, शेतमजूर, गोरगरीब, दलित, शोषित पीडित यांच्यासाठी आंदोलन करणारा, गोरगरीबांचा आंदोलक नेता, दिव्यांगांसाठी खऱ्या अर्थाने लढणारा, झटणारा नेता म्हणून बच्चू भाऊ तुमची ओळख आहे. तुम्ही आज शिवसेनेत असंख्य लोकांसह प्रवेश केला. त्यासाठी तुमचं मनापासून शिवसेनेत स्वागत करतो.'एकनाथ शिंद म्हणाले, 'शिवसेना तुम्हाला नवीन नाही. तुम्ही मूळचे शिवसैनिक आहात. २५ वर्ष प्रहार सामाजिक संघटनेचे काम केले. आज स्वगृही शिवसेनेत आलात. आपण आमदारकरीसाठी आलेला नाहीत हे स्पष्ट केले. तुमची धेय्य, धोरणे, गरीबांना न्याय देण्याचा मुद्दा याला कुठेतरी सत्तेचे बळ लागते.

# बंगळुरूत मुसळधार पाऊस ७ ठार

प्रतिनिधी ३० एप्रिल

**बंगळुरु:** बंगळुरुमध्ये बुधवारी मुसळधार पावसादरम्यान रुग्णालयाची भिंत कोसळल्याने ७ लोकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ३ मुलांचाही समावेश आहे. ७ जखमींना वाचवण्यात आले आहे.अपघाताच्या वेळी रस्त्याच्या कडेला असलेले विक्रेते आणि वाटसरू ढिगाऱ्याखाली सापडले. अनेक लोक ढिगाऱ्याखाली दबले होते, ज्यांना बचाव पथकाने बाहेर काढले.प्राथमिक माहितीनुसार, मुसळधार पावसामुळे बोवरिंग अँड लेडी कर्झन रुग्णालयाची भिंत कमकुवत झाली होती. तथापि, प्रशासनाने सांगितले आहे की अपघाताच्या कारणांची चौकशी केली जात आहे.मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला आणि मृतांच्या कुटुंबीयांसाठी प्रत्येकी ५-५ लाख रुपये नुकसानभरपाईची घोषणा केली.उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनीही घटनास्थळी भेट दिली आणि दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. तर, विरोधकांनी याला प्रशासकीय निष्काळजीपणा संबोधत सरकारवर टीका केली आहे. सरकारचे म्हणणे आहे की, तेथे फेरीवाल्यांना वस्तू विकण्याची परवानगी देण्यात आली होती.

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधान परिषदेचा उमेदवार ठरला...!

## झिशान सिद्दिकींच्या नावावर शिक्कामोर्तब



प्रतिनिधी ३० एप्रिल

**मुंबई:** विधान परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आलेल्या एकमेव जागेचा पेच अखेर सुटला आहे. पक्षाचे तरुण नेते आणि माजी आमदार झिशान सिद्दिकी यांना उमेदवारी देण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींकडून घेण्यात आला आहे. काल रात्री उशिरापर्यंत चाललेली कोअर कमिटीची बैठक आणि त्यानंतर झालेली वरिष्ठ नेत्यांची चर्चा यानंतर झिशान सिद्दिकींच्या नावावर अधिकृत मोहोर उमटवण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर काँग्रेसची साथ सोडून अजित पवारांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारे बाबा सिद्दिकी हे पहिले बडे नेते होते. त्यांच्या निधनानंतर सिद्दिकी कुटुंबाची राजकीय वारसदारी झिशान सिद्दिकी समर्थपणे सांभाळत आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी झिशान यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यांच्या याच निष्ठेचा विचार करून पक्षाने त्यांना विधान परिषदेवर पाठवण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर झिशान सिद्दिकी म्हणाले, आजचा दिवस माझ्यासाठी महत्त्वाचा आहे. मी वहिनी साहेब, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, पार्थ पवार यांचे आभार मानतो. त्यांनी मला एक संधी दिली. अजितदादांचा जो वादा होता, तो त्यांनी पूर्ण केला. माझ्यासारख्या युवा नेतृत्त्वाला त्यांनी विधान परिषदेत पाठवले. देशातील युवा वर्गाला राष्ट्रवादी पक्षाशी जोडण्यासाठी मी पूर्णपणे प्रयत्न करेल. अल्पसंख्याकांसाठी आवाज उठवेल. वहिनी साहेबांच्या नेतृत्त्वा महिला सक्षमीकरणासाठी काम करू. आपले दु:ख बाजुला ठेवून आपल्याला लोकांसाठी काम करायचे आहे, असे वहिनीसाहेबांनी मला सांगितले आहे.

# अमोल मिटकरींनी व्यक्त केली खदखद


प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला:** राज्यातील विधान परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारगटाकडून माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना संधी देण्यात आली आहे. मात्र या उमेदवारीवरून आता पक्षात नाराजीचे सूर उमटताना दिसून येत आहेत. विधानपरिषदेसाठी पुन्हा संधी न मिळाल्यामुळे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली आहे. दरम्यान, राष्ट्रवादीच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये माजी आमदारांना वगळल्याबद्दल उघड आनंद व्यक्त केला जात आहे.'माझ्याशी कोणताही संपर्क साधला गेला नाही किंवा मला विश्वासातही घेतले गेले नाही,' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार गट) विधान परिषद निवडणुकीसाठी आता झिशान सिद्दीकी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. झिशान सिद्दीकी याना उमेदवारी मिळाल्यानंतर आता यावर प्रतिक्रिया देताना अमोल मिटकरी यांनी आपली खदखद बोलून दाखवली आहे.

पण दुःख एकाच गोष्टीचे वाटते की, जर ही जागा झिशान यांना द्यायची होती, तर 'दादां'नी (अजित पवार) किमान फोन करून मला सांगितले असते. की यावेळी तुम्हाला थांबावे लागेल, तुम्हाला एकदा संधी दिली आहे, आता दुसऱ्याला संधी देऊ,' असे सांगून मला विश्वासात घ्यायला हवे होते. मात्र, मला साधा फोनही केला गेला नाही.'असे म्हणत त्यांनी पक्ष श्रेष्टींविषयीची नाराजी बोलून दाखवली.

# 30 हजारांची लाच घेताना महिला अभियंता ताब्यात

प्रतिनिधी ३० एप्रिल



**अकोला:** अकोला पंचायत समितीमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत ३० हजारांची लाच घेताना महिला कनिष्ठ अभियंत्याला रंगेहात ताब्यात घेतले आहे. कपिलेश्वर येथील बांधकाम प्रकरणाशी संबंधित हा प्रकार असल्याची माहिती समोर आली आहे.

अकोला पंचायत समितीच्या बांधकाम विभागात भ्रष्टाचाराचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. कपिलेश्वर येथील बांधकाम कामांशी संबंधित प्रकरणात तक्रारदाराकडून ३० हजार रुपयांची लाच मागण्यात आल्याची माहिती समोर आली.तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबी च्या पथकाने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारताना जया इंगोले नामक महिला कनिष्ठ अभियंत्याला रंगेहात पकडण्यात आले. अधिकाऱ्यांनी कारवाई करताच महिला अधिकाऱ्याचे पाण्याची बॉटल, स्कार्फ मात्र जागेवरच राहिले. संबंधित बांधकाम कामांना मंजुरी देणे किंवा प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी ही लाच मागण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. कारवाईनंतर आरोपी अधिकाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.या घटनेमुळे पंचायत समितीच्या बांधकाम विभागात खळबळ उडाली असून, अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# तीन कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला:** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने कंबर कसली आहे. अकोला जिल्ह्यात कृषी निविष्ठा विक्रीत अनियमितता आढळल्याने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी मोठी कारवाई केली असून, सुनावणीअंती तीन कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

अकोला जिल्हा आणि तालुकास्तरीय भरारी पथकांनी जिल्ह्यातील विविध कृषी केंद्रांची अचानक तपासणी केली होती. या तपासणीत एकूण ८ कृषी केंद्रांमध्ये नियमबाह्य बाबी आढळून आल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने नोंदणी प्रमाणपत्र ग्राहकास दिसेल असे न लावणे, गोदामातील प्रत्यक्ष साठा आणि मशीनवरील साठ्यामध्ये मोठी तफावत असणे, शेतकऱ्यांना अधिकृत पक्की बिले न देणे, साठा फलक आणि दर फलक अद्ययावत न ठेवणे आढळून आल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित ८ केंद्रचालकांची जिल्हा स्तरावर सुनावणी घेण्यात आली, ज्यामध्ये तीन केंद्रांवर निलंबनाची कारवाई झाली आहे. या मध्ये अकोट जिनिंग अँड प्रेसिंग सहकारी फॅक्टरी लि., अकोट, चोहट्टा बाजार येथील जयेश अॅग्रो सेंटर हे दोन्ही २ महिने साठी निलंबित करण्यात आले असून पातूर तालुक्यातील आलेगाव येथील तायडे अॅग्रो सेंटर हे १ महिन्या साठी निलंबित करण्यात आले आहे. याच बरोबर इतर पाच केंद्रांना त्रुटींबाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे. खरीप हंगामासाठी जिल्ह्यात पुरेसा खत आणि बियाणे साठा उपलब्ध आहे. मात्र, विक्रेत्यांनी कोणत्याही प्रकारचा काळाबाजार किंवा 'लिंकिंग' करू नये, असा स्पष्ट इशारा सुद्धा प्रशासनाने दिला आहे. शेतकऱ्यांना तक्रार असल्यास त्यांनी आपल्या तालुक्यातील पंचायत समिति किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील तक्रार निवारण कक्षात संपर्क साधावा. नियमबाह्य काम करणाऱ्या विक्रेत्यांवर यापुढेही कडक फौजदारी कारवाई करण्याचा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

**सिटी न्यूज सुपरफास्ट**

**सुचना**

सर्व एजंट, प्रतिनिधी, वाचक, यांना कळविण्यात येते की, दि. १मे२०२६ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त दै. सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालयाला सुट्टी राहणार आहे. त्यामुळे दि.१ मे २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

- वितरण व्यवस्थापक

# १ मेपासून कारवाईच..! मराठी अनिवार्य

**पुणे** :महाराष्ट्रात व्यवसाय करणाऱ्यांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या भूमिकेवर राज्य सरकार ठाम असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पिंपरी-चिंचवड शहरात माध्यमांशी बोलताना याबाबत स्पष्ट इशारा दिला. महाराष्ट्रातमराठी सक्तीचा नियम नवीन नसून १९८९ पासूनच तो अस्तित्वात असल्याचे त्यांनी सांगितले. या नियमात नुकत्याच काही सुधारणा करण्यात आल्या असून, त्याची अंमलबजावणी अधिक कडकपणे करण्याचा निर्णय घेण्यात आला

# मेडशी बायपासवर भीषण अपघात

## अपघाताच्या मालिकेला कंटाळून मेडशी गावकऱ्यांचा रस्ता रोको





प्रतिनिधी ३० एप्रिल



**मेडशी :** अकोला नांदेड महामार्गाची निर्मिती झाल्यापासून मेडशी गावाला बायपास देण्यात आला.मात्र सदर कामात राष्ट्रीय रस्ते प्राधिकरने रस्त्याचे काम करताना मोठी घोड चूक केली आहे. नको असलेल्या ठिकाणी कोट्यावधी रुपये खर्च करून उड्डाणपुलाची निर्मिती केली. आणि हवे असल्या ठिकाणी मोकळे सोडून दिले. त्यामुळे मेडशी गावात प्रवेश करायचा असेल किंवा गावाच्या बाहेर निघायचे असेल नागरिकांना आपला जीव मुठीत घालून प्रवास करावा लागतो.

आतापर्यंत कित्येक निष्पाप नागरिकांचे या अपघातामध्ये दुर्दैवी मृत्यू झाले काहींना तर आयुष्यभराचे अपंगत्व आले.आज दि ३० एप्रिल रोजी सकाळी साडे सहाच्या सुमारास गावातील महिला मजुरांचा मोठा भीषण अपघात झाला. त्यामध्ये काही महिला गंभीर जखमी असून त्यांना तात्काळ वाशिम व अकोला येथील रुग्णालयात हलविण्यात आले. वारंवार होणाऱ्या या अपघाताची मालिका आणि जाणाऱ्या निष्पाप नागरिकांचा जात असलेला जीव त्या विरोधात आज मेडशी गावातील नागरिकांनी रोष व्यक्त करत अकोला नांदेडरोड व रस्ता रोको केला. जोपर्यंत रस्त्यावर गतिरोधक बसत नाही तोपर्यंत रस्ता मोकळा न करण्याचे आंदोलन कर्त्यांचे म्हणणे होते. मात्र घटनेचे गांभीर्य ओळखत मालेगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजेश खेरडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत उपस्थित नागरिकांच्या भावना समजून घेत येत्या काही दिवसात येथे गतिरोधक बसविण्याचे आश्वासन दिले व रस्ता मोकळा करून दिला.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com


## शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीला

खरीप हंगामाच्या तयारीला शेतकरी लागले आहेत. बियाणे खतांची खरेदी तसेच मशागत पूर्ण करण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. संपूर्ण वर्षाचे नियोजन करण्यासाठी खरीप हंगाम अत्यंत महत्त्वाचा असतो. त्या दृष्टीने जिल्ह्यातील शेतकरी तयारी करीत आहे. सद्या जमीनी तयार करण्यावर शेतकऱ्यांचा भर दिसत आहे. कारण जून महिन्यात पाऊस होण्याची शक्यता राहते. त्या अगोदर हंगामाची तयारी करण्यावर शेतकऱ्यांनी भर दिलेला दिसत आहे. भर उन्हात मशागतीची कामे शेतकरी करीत आहे. कारण पुढील संपूर्ण नियोजन खरिप हंगामावर अवलंबून असते. त्या दृष्टीने शेतकऱ्यांनी जोरदार तयारी केलेली दिसून येत आहे.

# नवभारताच्या निर्मितीत राष्ट्रसंतांचे लोकोत्तर कार्य

भारतीय संतपरंपरा ही केवळ अध्यात्मिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचीही प्रभावी परंपरा मानली जाते. या परंपरेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्थान अत्यंत अग्रगण्य आहे. ३० एप्रिल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जयंती दिन. राष्ट्रसंतांच्या सूचनेवरुन त्यांचा जन्मदिवस ग्रामजयंती उत्सव म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील यावली येथे ३० एप्रिल १९०९ रोजी झाला. नवभारताच्या निर्मितीत ज्या संतांनी एक संघ, भारत समृद्ध भारत निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर प्रयत्न केले त्याचे अग्रणी आणि या कल्पनेचे नेतृत्व साकारणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आजच्या काळातही राष्ट्रसंत म्हणून वंदनीय ठरतात. संत परंपरेतील इतर संतांप्रमाणेच त्यांनी भजन, कीर्तन, प्रवचन यांचा उपयोग करुन जनजागृती केली; मात्र त्यांच्या कार्याचा व्याप केवळ धार्मिक मर्यादांमध्ये न राहता राष्ट्रनिर्मितीपर्यंत पोहोचला. त्यामुळेच त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी लाभली.

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती



*'नांदोत सुखे गरीब-अमीर एकमतानी'*
*दे वरची असा दे, या भारतात बंधुभाव नित्य वसू दे'*

नागपूर विद्यापीठाने त्यांच्या गीताला विद्यापीठ गीत म्हणून स्वीकारले आहे. विद्यापीठाच्या गीतात उमटणारे राष्ट्रसंतांचे भजन ऐकले की आजही मन भरुन येते. या ओळी केवळ भजन नाहीत, तर भारताच्या अस्तित्वाचा मूलमंत्र आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बंधुता टिकली तरच राष्ट्र टिकते' हा विचार ठामपणे मांडला. आहे. त्याच धर्तीवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या भजन, कीर्तन आणि ग्रामविकासाच्या कार्यातून सर्व धर्म, पंथ आणि समाजघटकांना एकत्र आणण्याचा लोकोत्तर प्रयत्न केला. त्यांनी १९४३ साली अमरावती-नागपूर महामार्गावरील 'मोझरी' येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. हे स्थळ सर्वधर्मीय समन्वयाचे तीर्थक्षेत्र बनले आहे. ङ्कसब के लिए खुला है मंदिर यह हमाराङ्क या ब्रीदाखाली येथील कामकाज चालते. येथील प्रार्थना मंदिरात सर्व धर्माच्या संतांना समान स्थान देण्यात आले आहे.

#### संतपरंपरेचा आधुनिक विस्तार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव यांच्या परंपरेचा वारसा पुढे नेला; मात्र त्यात आधुनिक राष्ट्रनिर्मितीची जोड दिली. त्यांनी भक्तीला केवळ वैयक्तिक साधना न ठेवता सामाजिक जबाबदारीशी जोडले. देशाच्या उत्थानात अध्यात्माला पुढे केले.

त्यांच्या भजनांमधील साधेपणा आणि स्पष्टता जनमानसाला थेट भिडणारी आहे. देह मंदिर, मन पुजारी, सेवा हीच आरतीङ्क, ङ्कमानवा जागा हो रे, सेवा धर्म पाळ रेङ्क तसेच ङ्कमनी नाही भाव म्हणे देवा मला पावष्ठ देव बाजारचा भाजीपाला नाही रेङ्क या ओळींमधून त्यांनी अंधश्रद्धा, दिखाऊ भक्ती आणि कर्मकांडांवर प्रखर प्रहार केला. त्यांचे साहित्य हे केवळ आध्यात्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन होते.

#### साहित्य आणि समाजजागृतीचा सेतू

राष्ट्रसंतांचे साहित्य हे 'लोकसाहित्य' होते ज्यात श्रम, माणुसकी आणि नैतिकता यांचा संगम आहे. ते स्वतः म्हणतात 'मी पोथी वाचीत न बसता जीवनाचा ग्रंथ वाचला.'

त्यांच्या ओळी 'पहारे आणि तिजोऱ्या, त्यातून होती चोऱ्याष्ठ दारास नाही दोऱ्या या झोपडीत माझ्या' जगण्यासाठी लागणाऱ्या मूल्यापेक्षा अन्य श्रीमंतीला महत्त्व देणे अयोग्य असल्याचे सांगतात. चित्ती असावे समाधान यावर त्यांच्या साहित्याचा अधिक भर राहिला आहे. त्यांच्या साहित्याच्या ओळी अशा जनसामान्यात रुजलेल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात शेकडो गावांमध्ये रोज सायंकाळी होणारी सामुदायिक प्रार्थना सर्वधर्मसमभावाचा दररोजचा उत्सव आहे. यामध्ये सर्व समाजाचे सर्व जातीपंथांचे नागरिक सहभागी होतात. ही प्रार्थना केवळ आध्यात्मिक प्रार्थना न राहता माणसाला माणुसकीच्या समान पातळीवर सन्मानाने आणणारी आराधना बनून जाते...

त्यांनी आपल्या साहित्यामध्ये देखील सामान्यातल्या सामान्य माणसाच्या भूमिका अपेक्षा आणि शुभचिंतनाला मांडले आहे. त्यांनी साहित्याच्या भूमिकेतून अंधश्रध्देवर प्रहार केला.

*देवाचिया नावाखाली । काही देतात जीव बळी*
*बंद करावी प्रथा असली । भावना सुधोरीनी लोकांची*

साहित्य हे झोपडीतल्या माणसाला समजावे, शेतकऱ्याच्या नांगरात उमटावे आणि समाजातील अन्याय दूर करणारे असावे,अशी त्यांची भावना होती. त्यामुळेच त्यांचे साहित्य हे जनतेचे, जनतेसाठी आणि जनतेकडून निर्माण झालेले मानले जाते. श्रमाचा त्यांनी सत्कार केला; आपल्या लेखनात त्याचा पुरस्कारही केला.

श्रमनिष्ठेचा करावा प्रचार । सर्वास आपुलकी वाटे पुरेपूर
ऐसी व्यवस्था करावी सुंदर । गावचे उत्पादन वाढवोनी

#### स्वातंत्र्यलढ्यातील राष्ट्रभक्ती

स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रसंतांनी जनतेमध्ये स्वातंत्र्याची ज्वाला पेटवली. चिमूर-आष्टी आंदोलनाच्या काळात त्यांच्या भजनांनी लोकांमध्ये प्रचंड प्रेरणा निर्माण केली. ङ्कपत्थर सारे बम बनेंगे, भक्त बनेगी सेनाष्ठङ्क यातून त्यांनी ब्रिटीश सरकारच्या अन्यायाला इशारा दिला होता. त्यांच्या राष्ट्रभक्तीपर कार्यामुळे ब्रिटिश सत्तेला ते खटकले आणि त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. त्यांनी महात्मा गांधी यांच्या चळवळींना पाठिंबा दिला, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची पाठराखण केली, अस्पृश्यता निवारणासाठी कार्यही केले, महात्मा गांधी यांच्यासोबत त्यांनी सेवाग्राम आश्रमातही वास्तव केले. त्यामुळे ते केवळ संत न राहता राष्ट्रनिर्मितीचे सक्रिय सहभागी ठरले. लेखन, समाजसेवा, ग्रामविकास, राष्ट्रोन्नती, राष्ट्रविकास आणि बलशाली एकजूट भारतासाठी देश-विदेशाचे भ्रमण, चिंतन हेच त्यांचे आयुष्य राहिले.

#### स्वातंत्र्यानंतरचे राष्ट्रनिर्माण

स्वातंत्र्यानंतर राष्ट्रनिर्मितीत संतांचा सहभाग असावा, यासाठी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना आमंत्रित केले. आज उभ्या असलेल्या राष्ट्रपती भवनात १९५२ च्या सुमारास त्यांच्या खंजिरीची थाप निनादली आहे. राष्ट्रपती भवनात त्यांच्या खंजिरी भजनाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली. ही घटना लोकसंस्कृतीच्या गौरवाचे प्रतिक ठरली. तसेच त्यांनी विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत सक्रिय सहभाग घेतला आणि समाजसेवेचा मार्ग अधिक व्यापक केला. देशाच्या उभारणीत सर्व धर्मीय संत परंपरेला एकत्रित करण्याचे कार्य त्यांनी केले.

**ग्रामगीता :** ग्रामविकासाचा आराखडा राष्ट्रसंतांचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे 'ग्रामगीता'. या ग्रंथात त्यांनी गावाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा मांडला. 'गाव हा विश्वाचा नकाशा, गावावरून देशाची परीक्षा' ग्रामगीतेत स्वच्छता, शिक्षण, सहकार, नैतिकता आणि स्वावलंबन यांचा समन्वय दिसतो. 'ग्रामजयंतीचा मंत्र घ्या हो नवा, देशात समता नांदवा' हा त्यांचा संदेश आजही ग्रामीण विकासासाठी मार्गदर्शक आहे. त्यांनी 'प्रत्येक गावच पंढरपूर व्हावे' ही संकल्पना मांडून स्थानिक विकासाला आध्यात्मिक उंची दिली. गावगाडा बळकट करण्यासाठी त्यांनी ग्रामगीतेत मांडणी केली. स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, सहकार, शांतता, आर्थिक विकास सर्वच पातळीवर लेखन केले.

*सर्वांनी स्वच्छ, शिस्तबध्द व्हावे । परस्परांशी प्रेम करावे*
*तरीच गाव स्वर्ग व्हावे । सर्वतोपरी*
*गावाचा प्रत्येक सज्ञान । यांचे असावे सहकार्य पूर्ण*
*हाक देता सर्वजण । जमोनि यावेत एकत्र*

महाराष्ट्राच्या ग्रामविकासाचा खरा पाया तुकडोजी महाराजांची ग्रामगीता राहिली आहे.

*गावचे राज्य गावचि करी ।*
*कोणाचीच न चाले हुशारी ।*
*आमुचे आम्हीच सर्वतोपरी*
*नांदू गावी ।*

या ग्रामगीतेच्या ओळीला पंचायतराज व्यवस्थेतून गती मिळाली आहे. तर...

*गावागावांसी जागवा। भेदाभेद हा समूळ मिटवा ।*
*उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ।।*

हा राष्ट्रसंताचा संदेश अनेक योजनांचा पाया ठरला आहे.

#### समता, मानवता आणि धर्मदृष्टी

राष्ट्रसंतांनी धर्माची व्याख्या करताना माणुसकीला केंद्रस्थानी ठेवले. 'जो कोणी सत्यसिद्धांतीष्ठ समजावा चित्ती आपुलाचि' त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे कौतुक करताना 'मानवतेचे मंदिर उभारले' असे गौरवोद्गार काढले. त्यांच्या भजनांमध्ये सर्वधर्मसमभावाचा स्पष्ट संदेश आहे. ङ्कमग हिंदू असो, ख्रिश्चन वा हो इस्लामीष्ठङ्क ही विचारसरणी भारतीय संविधानातील बंधुता आणि समतेच्या मूल्यांशी सुसंगत आहे.

#### आंतरराष्ट्रीय कार्य आणि विश्वशांती

इ.स. १९५५ मध्ये जपानमध्ये आयोजित जागतिक धार्मिक परिषदेत सहभागी होऊन त्यांनी 'वसुधैव कुटुंबकम'चा संदेश दिला. मानवधर्म, विश्वशांती आणि समाजसेवा या मूल्यांचा त्यांनी जागतिक स्तरावर प्रचार केला. यामुळे त्यांच्या कार्याला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली.भारतभर प्रवास करुन त्यांनी संतांचे मेळावे घेतले आणि या संतांना राष्ट्र निर्मितीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. जापानमध्ये त्यांनी भारतीय विविधतेतील एकतेचा संदेश दिला.

#### गुरुकुंज मोझरी : कार्याचा केंद्रबिंदू

अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी हे त्यांच्या कार्याचे केंद्र आहे. याठिकाणी १९४३ मध्ये त्यांनी आश्रम स्थापन केला. येथे सामाजिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक उपक्रम आजही सुरु आहेत. महाराष्ट्र शासनाने मोझरी विकास आराखड्याद्वारे पायाभूत सुविधा आणि तीर्थक्षेत्र विकासासाठी मोठी तरतूद केली आहे. तसेच नागपूर विद्यापीठाला त्यांच्या नावाने ओळख देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. गुरुकुंज आश्रमातील प्रत्येक उपक्रम ग्रामगीतेच्या विचाराशी सुसंगत आहे. आदर्श ग्रामजीवनाचा पुरस्कार या आश्रमाची शिकवण देतो. केंद्र सरकारने ग्रामगीतेच्या माध्यमातून या आश्रमातून सुरु असलेल्या या कार्याची दखल घेतली आहे. आश्रमाचे सरचिटणीस जनार्दन पंत बोथे यांना २६ जानेवारी २०२६ रोजी पद्मश्री पुरस्कार घोषित केला आहे.

#### आजच्या काळातील संदर्भ

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगातही राष्ट्रसंतांचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. सामाजिक विभाजन, जातीभेद-धर्मभेद, ग्रामीण अधोगती आणि नैतिकतेचा अभाव या समस्यांवर त्यांच्या विचारांमध्ये उपाय दिसतो. त्यांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे. 'बैसू चला सर्व एकाचि रांगे' बंधुता, समता आणि सेवा या मूल्यांवर आधारित समाजरचना हीच खऱ्या अर्थाने नवभारताची पायाभरणी आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ अध्यात्मिक नव्हे, तर राष्ट्रनिर्मितीच्या व्यापक ध्येयाशी निगडित आहे. त्यांनी भजन, साहित्य, समाजकार्य आणि ग्रामविकास यांच्या माध्यमातून भारताला एकात्मतेचा मार्ग दाखवला.

आज त्यांच्या जन्मदिनी त्यांच्या विचारांचे स्मरण करताना, त्यांची अंमलबजावणी करणे हीच खरी आदरांजली ठरेल.ङ्कदे वरची असा दे, या भारतात बंधुभाव नित्य वसू देङ्क ही प्रार्थना केवळ शब्द न राहता, भारताच्या प्रत्येक नागरिकाच्या आचरणात उतरली, तरच राष्ट्रसंतांचे स्वप्न साकार होईल.

प्रवीण टाके
उपसंचालक(माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
मो.: ९७०२८५८७७७

# सूर्याचा 3 ते 31 मे महाराष्ट्र दौरा

**अकोला:** रोज नवनवे उच्चांक गाठणारा उष्णतेचा पारा आपल्या भागात विशेष म्हणजे जगात नंबर एकवर आहे.



निसर्गाचे असंतुलन, पर्यावरणीय ऱ्हास, वन संपदेची कमी आणि वाढणारे प्रदूषण.

दूरदृष्टीचा अभाव, अवाजवी गरजा सोबतच ग्लोबल वार्मिंग मूळे निसर्गचक्र बदलत आहे. सूर्याचे उत्तरायणाच्या प्रवासात अक्षवृत्तीय स्थितीनुसार ३ ते ३१ मे या कालावधीत सूर्य खास करून महाराष्ट्र दौऱ्यावर असताना हे उष्णतेचे प्रमाण अधिक असेल.

आपल्या राज्याची भौगोलिक स्थिती १५ ते २२ उत्तर अक्षांश असुन सूर्य किरणे सरळ पडण्याचा कालावधी सुमारे अठ्ठाविस दिवसांचा राहील.त्याची सुरुवात दक्षिणेकडून उत्तरेकडे असेल.या कालावधीत पूर्व-पश्चिम सुमारे एका अंशाच्या शंभर किलोमीटर अंतराच्या पट्ट्यातील ठिकाणी सूर्य किरणे लंब रुपात पडतील, त्या त्या भागात माध्यान्हाचे वेळी सूर्य नेमका डोक्यावर येईल.या ठिकाणी ङशून्य सावली दिवसङ अनुभवता येईल.

जगात नंबर वन वर असणारे अकोला बऱ्याच लोकांच्या मते कर्कवृत्तावर असल्याने येथे तापमान अधिक परंतु आपल्या पासून सुमारे तीनशे किलोमीटर दूरुन असलेले कर्कवृत्त भूज, गांधीनगर, भोपाळ, जबलपूर, राची, आदी शहरांचे जवळुन आठ राज्यातून गेले आहे.

बऱ्याच अंशी आपल्याच नको त्या गोष्टीतून वाढणारे हे महाकाय संकट अधिक उग्र स्वरूप धारण करण्या आधी थांबवणे जरा कठीण असले तरी ते लांबविण्यासाठी सार्वत्रिक स्वरूपात अथक आणि युद्ध पातळीवर प्रामाणिक प्रयत्नांची गरज आहे. असे विश्वभारती विज्ञान केंद्राला वाटते.प्रत्येकाने आवश्यक ती काळजी घेऊन आता तरी जागे होऊन एकमेकांना साथ देत,संकुचित दृष्टी अधिक व्यापक करून सुंदर सृष्टीचा विचार करुया.

प्रभाकर दोड
विश्वभारती विज्ञान केंद्र
अकोला

## दिन विशेष

### नृसिंह जयंती




नृसिंह जयंती ३० एप्रिल, गुरुवार रोजी साजरी केली जाईल. हा सण वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील चतुर्दशी तिथीला साजरा केला जातो. हा दिवस भगवान विष्णूंच्या 'नरसिंह' अवताराच्या प्रकटीकरणाचे प्रतीक आहे, जो अनिष्टावर इष्टाचा विजय आणि भक्तीच्या शक्तीचा संदेश देतो.

नृसिंह जयंतीला पूजा करण्याची सर्वात शुभ वेळ संध्याकाळची आहे. ३० एप्रिल रोजी दुपारी ०४:१७ ते संध्याकाळी ०६:५६ पर्यंत. चतुर्दशी तिथी प्रारंभ २९ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ७:५१ वाजता होईल तर चतुर्दशी तिथी समाप्ती रात्री ९:१२ वाजता.

**पूजा विधी आणि महत्त्व:**

व्रत आणि पूजा, भक्त सकाळी लवकर उठून स्नानादी कर्मांनंतर उपवासाचा संकल्प करतात. भगवान नृसिंहाची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापित करून त्यांना फळे, फुले, पंचमेवा आणि पिवळे वस्त्र (पीतांबर) अर्पण केले जातात. भगवान नृसिंह संध्याकाळी प्रकट झाले होते, म्हणून सूर्यास्ताच्या वेळी केलेली पूजा विशेष फलदायी मानली जाते. मंत्र: या दिवशी ॐ उग्रं वीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतोमुखम्। नृसिंहं भीषणं भद्रं मृत्यु मृत्युं नमाम्यहम् या मंत्राचा जप केला जातो. हा सण साहस, शक्ती आणि नकारात्मक ऊर्जेपासून संरक्षण मिळवण्यासाठी साजरा केला जातो.आजची पूजा तसेच नरसिंह आराधना फलदायी मानली जाते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : समाजप्रबोधनाचा दीपस्तंभ

भारतभूमी ही संतांची, महात्म्यांची आणि गव समाजसेवकांची भूमी आहे. या भूमीत अनेक संतांनी आपल्या कार्याने समाजाला योग्य दिशा दिली. त्यांपैकीच एक महान संत म्हणजे तुकडोजी महाराज. त्यांचे जीवन म्हणजे त्याग, सेवा आणि समाजप्रबोधन यांचे उत्कृष्ट उदाहरण होय. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या महान कार्याची आठवण करून देणे हे आपले कर्तव्य आहे.

भारतभूमी ही संतांची, महात्म्यांची आणि गव समाजसेवकांची भूमी आहे. या भूमीत अनेक संतांनी आपल्या कार्याने समाजाला योग्य दिशा दिली. त्यांपैकीच एक महान संत म्हणजे तुकडोजी महाराज. त्यांचे जीवन म्हणजे त्याग, सेवा आणि समाजप्रबोधन यांचे उत्कृष्ट उदाहरण होय. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या महान कार्याची आठवण करून देणे हे आपले कर्तव्य आहे.



तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील यावली या छोट्याशा गावात झाला. लहानपणापासूनच त्यांना भजन, कीर्तन आणि अध्यात्माची आवड होती. त्यांनी औपचारिक शिक्षण कमी घेतले, पण जीवनाच्या शाळेतून त्यांनी लोकांशी संवाद साधण्याची, त्यांना योग्य मार्ग दाखवण्याची कला आत्मसात केली.

तुकडोजी महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केले. ते गावोगावी जाऊन कीर्तन करत आणि लोकांना स्वच्छता, शिक्षण, नीतिमत्ता आणि एकात्मता यांचे महत्त्व पटवून देत. त्यांनी लोकांना अंधश्रद्धा सोडून विज्ञाननिष्ठ विचार स्वीकारण्याचे आवाहन केले. त्यांची वाणी प्रभावी आणि साधी असल्यामुळे सामान्य लोकांपर्यंत त्यांचे विचार सहज पोहोचत.

स्वातंत्र्यलढ्यातही तुकडोजी महाराजांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी लोकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत केली आणि समाजाला एकत्र आणण्याचे कार्य केले. त्यांच्या कीर्तनातून देशप्रेमाचा संदेश दिला जात असे. त्यामुळे त्यांना ङ्कराष्ट्रसंतङ्क ही उपाधी बहाल करण्यात आली.

त्यांनी गुरुदेव सेवा मंडळ या संस्थेची स्थापना करून समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक केले. या संस्थेमार्फत त्यांनी ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबन यावर भर दिला. गावांच्या उन्नतीसाठी त्यांनी ङ्कग्रामगीताङ्क हा ग्रंथ लिहिला, ज्यामध्ये आदर्श गाव कसे असावे याचे सविस्तर मार्गदर्शन केले आहे.

तुकडोजी महाराजांचे जीवन अत्यंत साधे होते. त्यांनी कधीही वैभवाची अपेक्षा केली नाही. साधी वस्त्रे, साधे राहणीमान आणि उच्च विचार हीच त्यांची ओळख होती. त्यांनी गरजूंना अन्न, वस्त्र आणि निवारा देण्याचे महान कार्य केले. त्यांच्या कार्यामुळे अनेक गरीब, अनाथ आणि वंचित लोकांना आधार मिळाला.

त्यांच्या कीर्तनातून त्यांनी मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला उन्नतीसाठी प्रेरित केले. ङ्कमानवसेवा हीच ईश्वरसेवाङ्क हा त्यांचा मूलमंत्र होता. त्यांच्या कार्यामुळे समाजात एक नवीन जागृती निर्माण झाली.

आजच्या आधुनिक युगातही तुकडोजी महाराजांचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत. स्वच्छता, शिक्षण, एकता आणि सेवा या मूल्यांचा आपण स्वीकार केला, तर समाज अधिक प्रगत आणि समृद्ध होईल. त्यांच्या शिकवणीचा अवलंब करून आपण समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो.

शेवटी, तुकडोजी महाराजांचे जीवन आपल्याला प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या आदर्शांचे पालन करून आपण आपल्या जीवनाला योग्य दिशा देऊ शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याला अभिवादन करून समाजसेवेची शपथ घेऊ या.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना विनम्र अभिवादन!

निवृत्ती तायडे
हिवरखेड
मो. नं. ७७०९५१७०९

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना ह्या जाहीर नोटीसी द्वारे सुचित करण्यात येते की माझे पक्षकार श्री. विनोद लक्ष्मणदास मोटवानी यांचे लग्न सौ. प्रिया विनोद मोटवानी यांच्याशी झाले असून त्यांना दोन मुलं नाव श्री. रोहित विनोद मोटवानी व श्री. यश विनोद मोटवानी आहेत. माझे पक्षकार श्री. विनोद लक्ष्मणदास मोटवानी यांनी मिळकत श्री. रामचंद्र साजनदास पंजवानी यांचेकडून दि. २०.०५.२०२२ च्या नोटराइज्ड दस्तान्वये खरेदी केली असून सदर मिळकत हि माझे पक्षकार यांच्या मालकीची व त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे त्याचे वर्णन मौजे अकोला प्र. ता. जि. अकोला र. स. डी. र. डी. अकोला, महानगरपालिका अकोला चे हद्दीतील शिट नं. ५७ लेआउट प्लॉट क्र. १/२ असून त्याचे मोजमाप पुर्व पश्चिम ३० फूट, ९.१४ मीटर व उत्तर दक्षिण १० फूट, ३.०५ मीटर असून त्याचा नवीन मनपा वार्ड नं. डि-३, मालमत्ता क्र. ११६३, जुना गट क्र. ४३ ज्याचे क्षेत्र ३०० चौ. फूट, २७.८७० चौ. मीटर असून या पूर्ण जागेत सदरहु प्लॉटवर पक्के बांधकाम केलेले दोन मजली घर असून त्यामध्ये तळ मजल्यावरील १ हॉल, १ किचन, १ रूम, १ पक्के संडास बाथरूम, १ बोअरींग मोटर पंप सहीत, इलेक्ट्रीक मीटर व पहिल्या मजल्यावरील १ हॉल, १ किचन, १ रूम, १ पक्के संडास बाथरूम. त्यास चतुःसीमाः - **पूर्वेसः** रोड, **पश्चिमेसः** स्मशान भूमीची जागा., **उत्तरेसः** गोविंदराम यांचे घर, **दक्षिणेसः** लघुजी थोरात यांचे घर.

माझे पक्षकार यांना लोकांकडून असे समझले कि त्यांचा लहान मुलगा श्री. यश विनोद मोटवानी व माझे पक्षकार यांची पत्नी सौ. प्रिया विनोद मोटवानी हिचा सोबत संगनमताने काही रक्कम उसनवार घेतली आहे. सदरहू जाहीर नोटीस द्वारे सर्व लोकांना कळवण्यात येते कि माझे पक्षकार मुलगा नामे श्री. यश विनोद मोटवानी व पत्नी सौ. प्रिया विनोद मोटवानी यांच्याशी काहीही संबंध नसून कोणीही माझे पक्षकार यांचा मुलगा माझे पक्षकार नामे श्री. यश विनोद मोटवानी व पती सौ. प्रिया विनोद मोटवानी यांच्याशी कुठलेही प्रकारचे आर्थिक व्यवहार करू नये व तसे केल्यास ते व्यवहार माझे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही आणि माझे पक्षकार त्या आर्थिक व्यवहारासाठी जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**ॲडव्होकेट**
**सौरभ, आर. तिवारी**
**शॉप नं. 29 बी, दुसरा मजला, आय.टी. स्क्रेयर**
**बिल्डिंग, गोरक्षण रोड, अकोला. फोन नं. 9881209846.**

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्हाधिकाऱ्यांकडून शास्त्री क्रीडांगणाची पाहणी

**अकोला :** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापनादिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभ दि. १ मे रोजी सकाळी ८ वाजता लालबहादूर शास्त्री क्रीडांगण येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने प्र. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी कार्यक्रमस्थळाची पाहणी केली. मुख्य कार्यक्रमात राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजवंदन होणार आहे. मुख्य शासकीय समारंभाच्या अनुषंगाने प्र. जिल्हाधिकारी स्वामी यांनी कार्यक्रमस्थळाची पाहणी केली. निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश भट आदी उपस्थित होते. क्रीडांगणाची स्वच्छता, रंगरंगोटी, सजावट आदी कामे तत्काळ पूर्ण करावीत. पथसंचलन तयारी, उपस्थितांसाठी पेयजल व्यवस्था, आरोग्य पथक, रूग्णवाहिका, चित्ररथ आदी सुविधा आदी तयारी पूर्ण करण्याचे निर्देश प्र. जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

## मुक्या प्राण्यांप्रती भूतदया



**हिवरखेड:** आई कुसुमाई पुण्यतिथी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती निमित्त मुक्या प्राण्यांना चारा वितरीत करण्यात आला. आई कुसुमाई सेवा समितीकडून हा उपक्रम राबवला जातो. गावातील गोधन तसेच जनावरांना चारा वितरीत केला. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. जनावरांना चारा पाण्याची समस्या उग्र झाली आहे. अशा वेळी चारा उपलब्ध व्हावा या अनुषंगाने पुढाकार घेतला.

### महानगरात महेश नवमीची तयारी सुरू

**अकोला :** माहेश्वरी समाजाचा उदयदिन महेश नवमी संपूर्ण भारतभर भव्यतेने साजरी केली जाते. यंदा २३ जूनला महेश नवमी येत आहे. या निमित्ताने १९ जूनपासून २३ जूनपर्यंत विविध शैक्षणिक, धार्मिक व समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल, अशी माहिती यंदाच्या महेश नवमी उत्सव प्रमुख नरेश बियाणी यांनी दिली. माहेश्वरी समाज ट्रस्टच्या कार्यकारिणी समिती सदस्य व सर्व संलग्न संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत बियाणी यांनी आपले विचार मांडले.

# शेतात आग लावून 16 लाखांचे नुकसान

### आग लावणाऱ्या पाच जणांविरुद्ध शेतकऱ्याची तक्रार

. प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील चांदूर येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील पिकाला आग लावून तब्बल १६ लाख रुपयांचे नुकसान केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी खदान पोलीस स्टेशनमध्ये पाच जणांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.



तक्रारदार गजानन सखाराम खराटे (वय ६५, रा. चांदूर, अकोला) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या शेतात कंपनीसोबत करार केलेले उच्च दर्जाचे बियाणे (बेणे) लावले होते. २२ एप्रिल रोजी गावातीलच पाच व्यक्तींनी त्यांच्या शेताच्या धुऱ्याला आग लावली. ही आग वाऱ्यामुळे संपूर्ण पिकात पसरली. गजानन खराटे यांनी स्थानिक नागरिक नितीन कोकदे आणि सैय्यद ऐजाज यांच्या मदतीने आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे पिकाचे प्रचंड नुकसान झाले.

या आगीत सुमारे १० लाख रुपयांचे बियाणे आणि ६ लाख रुपयांचे इतर पिकांचे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर गावात माजी जिल्हा परिषद सदस्य लखु आप्पाजी लंगोटे यांच्या उपस्थितीत एक बैठकही घेण्यात आली. या बैठकीत जेव्हा खराटे यांनी नुकसान भरपाईची मागणी केली, तेव्हा आरोपींनी त्यांना भरपाई देण्यास नकार दिला. इतकेच नाही तर, 'आमच्या घरात १० ते १२ लोक आहेत, तुम्ही एकटेच आहात, शेतात आलात तर जीवाने मारून टाकू,' अशी धमकीही त्यांना देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. गजानन खराटे यांनी मोतीराम जानकीराम खताडे, अक्षय लक्ष्मण खताडे, दयाराम जानकीराम खताडे, राजेश बापुराव खताडे, लक्ष्मण जानकीराम खताडे यांच्या विरोधात तक्रार दिली आहे.

घटनेनंतर सुरुवातीचे चार-पाच दिवस गजानन खराटे आग विझवण्यात आणि पिकाचा पंचनामा करण्यात व्यस्त होते. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या मध्यस्थीने नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रयत्न सुरू होते. मात्र, आरोपींनी सहकार्य न करता उलट धमकावल्यामुळे अखेर २७ एप्रिल रोजी त्यांनी पोलिसांत धाव घेतली. खदान पोलिसांनी याप्रकरणी भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा नोंदवून आरोपींवर तातडीने कारवाई करावी आणि आपल्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी गजानन खराटे यांनी केली आहे.

## १४४ नाल्यांची सफाई 'युद्धपातळीवर' करा

### गिरीश जोशी यांची मनपाकडे मागणी

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला:** पावसाळा सुरू होण्यास आता केवळ एक महिन्याचा कालावधी शिल्लक राहिला आहे. ही बाब लक्षात घेता अकोला महानगरपालिका प्रशासनाने शहरातील सर्व १४४ मोठ्या नाल्यांची साफसफाई युद्धपातळीवर सुरू करावी, अशी मागणी माजी नगरसेवक तथा भाजप प्रसिद्धीप्रमुख गिरीश जोशी यांनी केली आहे.राज्यात अनेक ठिकाणी स्वच्छता मोहिमेला वेग आला असला, तरी अकोल्यात अद्याप नालेसफाईला अपेक्षित गती मिळालेली नाही. ७ जूनपूर्वी ही मोहीम पूर्ण होणे आवश्यक आहे. मनपा आयुक्त, महापौर आणि सभापतींनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन कामाला गती द्यावी, असे जोशी यांनी निवेदनात म्हटले आहे. शहरातील अनेक सखल आणि दाट वस्तीच्या भागांत पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या उद्भवतात. यात प्रामुख्याने खालील भागांचा समावेश होतो यामध्ये मोठी उमरी, गीता नगर आणि शिवसेना वसाहत,डाबकी रोड, रणपिसे नगर आणि अकोट फाईल,न्यू तापडिया नगर, खरप परिसर, दुर्गा चौक आणि खडकी यांचा समावेश होतो. या परिसरातील नागरिकांच्या घरांत आणि रस्त्यांवर पाणी साचत असल्याने जनजीवन विस्कळीत होते. हद्दवाढ क्षेत्रासह शहरात एकूण १४४ मोठे नाले असून, त्यांची स्वच्छता वेळेत न झाल्यास पुन्हा जलमय स्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या उष्णतेची लाट असून तापमान मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. ही परिस्थिती पाहता, नालेसफाईचे काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याचा विचार करून हे अभियान सकाळच्या सत्रात राबवण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण सूचनाही गिरीश जोशी यांनी मनपा प्रशासनाला केली आहे.

# अकोट पालिकेचा कर विभाग झोपेत?

### करबुडव्यांची चलती; 'विद्यांचल द स्कूल' वर थकबाकीचा ठपका

वि. प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोट :** अकोट शहरात मालमत्ता कर बुडवणाऱ्यांचा सुळसुळाट वाढत असताना नगरपरिषदेच्या कर विभागाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. व्यापारी संकुले, रुग्णालये, शाळा व निवासी मालमत्ता अशा विविध घटकांकडून वर्षानुवर्षे कर थकवला जात असल्याच्या चर्चा रंगत असून, पालिकेकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याच पार्श्वभूमीवर शहरातील नामांकित 'विद्यांचल द स्कूल'ने गेल्या कित्येकवर्षांपासून मालमत्ता कर भरलेला नसल्याची माहिती समोर आल्याने खळबळ उडाली आहे. मोठ्या संस्थांवर कारवाई करण्यात प्रशासन टाळाटाळ करत आहे का? आणि सामान्य नागरिकांवरच कडक भूमिका घेतली जाते का? असा दुहेरी निकष लागू केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, सम्राट युवाशक्ती संघटनेचे प्रदेश अध्यक्ष विशाल आग्रे यांनी केलेल्या तक्रारीनंतर अखेर नगरपरिषद प्रशासन हलले असून, संबंधित शाळेला मालमत्ता कर आकारणीसंदर्भात नोटीस बजावण्यात आली आहे. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमाच्या कलम १०५ नुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

नोटीसनुसार शाळेला सात दिवसांच्या आत खुल्या जागेचे खरेदी खत, बांधकाम परवानगी, मंजूर नकाशा, सातबारा उतारा व फेरफार पत्रक आदी कागदपत्रे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निर्धारित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास नगरपरिषदेने केलेली कर आकारणी ग्राह्य धरून पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

मात्र, इतक्या वर्षांपासून कर थकबाकी असताना प्रशासनाने आतापर्यंत कोणतीही ठोस कारवाई का केली नाही, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे. शहरातील अनेक मालमत्ता कर नोंदवहीतच नसल्याची चर्चा असून, यामागे गैरव्यवहार तर नाहीत ना, अशी शंका व्यक्त होत आहे.

> पहिली नोटीस देऊन सात दिवस झाले उत्तर मिळाले नाही, विद्यांचल द स्कूलला दुसरी नोटीस देण्यात येणार आहे. सात दिवसांत उत्तर आल्यास नगर पालिकेची नियमाप्रमाणे पुढील कारवाई केली जाईल.
>
> **तेजस हागोने**
> कर निरीक्षक
> अकोट नगर पालिका

शहरातील सर्व करबुडव्यांचा शोध घेऊन त्यांच्याकडून दंडासह कर वसूल करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. 'कर न भरणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली तरच शिस्त लागेल,' असे मतही व्यक्त होत आहे.

> शाळेचे बांधकाम व बांधकाम परमिशन नियमानुसार आहे का तसेच शाळा सुरू झाल्यापासून आतापर्यंत विद्यांचल द स्कूल शाळेने शासनाचा कर भरला नाही सर्व कर दंडासहीत शाळेजवळून नगरपरिषदेने भरून घ्यावा अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल
>
> **विशाल आग्रे**
> प्रदेश अध्यक्ष सम्राट
> युवाशक्ती संघटना

## आमदार टी. राजासिंह यांची ३ मे रोजी 'हिंदु-राष्ट्र जागृती सभा'

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला:** हिंदूबहुल असलेल्या या देशात हिंदूंना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. घुसखोरी, गोहत्या, धर्मांतर, लव्ह जिहाद, हलाल जिहाद, वक्फ जिहाद यांसारखी संकटे दिवसेंदिवस उग्र रूप धारण करत आहेत. दिल्लीतील स्फोट घडवणाऱ्या उच्चशिक्षित जिहाद्यांची क्रूरता पाहता ही स्थिती हिंदूसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. या सर्व आव्हानांवर 'हिंदु राष्ट्र' हेच एकमेव उत्तर असून, ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी आदर्श हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, त्याच धर्तीवर धर्माधिष्ठित कल्याणकारी हिंदु राष्ट्राची स्थापना व्हावी या उद्देशाने रविवार, ३ मे २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता एकविरा मैदान, माधव नगर, गोरक्षण रोड, येथे 'हिंदु राष्ट्र-जागृती सभे'चे आयोजन करण्यात आले आहे.




या सभेसाठी हिंदुत्वाची बुलंद तोफ म्हणून ओळखले जाणारे भाग्यनगर येथील श्रीराम युवा सेनेचे संस्थापक-अध्यक्ष आमदार टी. राजासिंह, सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडये, तसेच हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट हे मान्यवर उपस्थित राहून हिंदूंना मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे श्री. श्रीकांत पिसोळकर यांनी दिली. ते सेंट्रल प्लाझाच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

हिंदु जनजागृती समितीचे विदर्भ समन्वयक श्रीकांत पिसोळकर म्हणाले, ठसभेच्या निमित्ताने शहरासह आजूबाजूच्या ५० हून अधिक गावांमध्ये प्रसारकार्य वेगाने सुरू आहे. हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे संयोजक उदय महाङ म्हणाले की, ठसभेच्या प्रचारासाठी व्यापाऱ्यांमध्ये मोठी जागृती होत आहे.

सुनील घनवट म्हणाले, ठहिंदु राष्ट्र-जागृती सभा हिंदूंसह हिंदु धर्मावर होणारे राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक आघातांविषयी प्रबोधन करत आहेत. या सभा धर्म आणि राष्ट्राप्रती प्रेम वृद्धिंगत करतात. भारताला 'हिंदु राष्ट्र' घोषित करण्यासाठी सामान्य हिंदू, हिंदु संघटना आणि विविध संप्रदायांना संघटित करणे, हा या सभेचा मुख्य उद्देश आहे. अकोलेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले.

पत्रकार परिषदेला सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक संत सद्गुरु स्वाती खाड्ये, श्रीकांत पिसोळकर हिंदू जनजागृती समितीचे विदर्भ समन्वयक,स्वयंभू महादेव मंदिर अंतरि अध्यक्ष व महाराष्ट्र मंदिर महासंघाचे सदस्य अरविंद देठे, विश्व हिंदू परिषदेचे अकोलाचे अध्यक्ष राजू मंजुळकर, उद्योजक संजय ठाकूर, हिंदु राष्ट्र समन्वय समिती अकोल्याचे संयोजक उदय महा, सुरज भगेवार प्रांत संयोजक बजरंग दल हे व्यासपीठावर उपस्थित होते.

# उष्मालाट व अवेळी पावसाची शक्यता

### दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला :** जिल्ह्यात २९ एप्रिल ते दि. ३ मे दरम्यान उष्णतेची लाट राहील, तसेच या कालावधीत अवेळी पावसाची शक्यताही नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तविली आहे. या काळात नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

यादरम्यान ताशी ४० ते ५० किमी प्रतितास याप्रमाणे हवेचा वेग राहण्याची शक्यता आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याबाबत सुचित करण्यात येत आहे. उष्मालाट असल्याने दुपारी १२.०० ते ४.०० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत,उन्हात वाहने शक्यतो चालवू नये, ज्वलनशील पदार्थां पासून शक्यतो दूर राहावे. लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. पशुधनास तसेच पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी देण्यात यावे. वीज, वारा व पावसापासून बचावाकरिता सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्यात यावा. अशा स्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. पाऊस व विजांच्या स्थितीत मोबाईल फोनचा उपयोग टाळावा. शेतक-यांनी आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा.

**कामगार व नागरिकांच्या संरक्षणासाठी तातडीच्या उपाययोजना**

उष्मालाटेमुळे सर्वाधिक प्रभावित होणारे घटक म्हणजे बांधकाम कामगार, वीटभट्ट्या कामगार, खाणकाम, शेती आणि असंघटित क्षेत्रातील कामगार आहेत. त्यासाठी विविध विभाग, यंत्रणा, आस्थापनांनी कार्यस्थळावर उपाययोजना करण्याचे निर्देश आहेत. तीव्र उष्णलाटांपासून बचावासाठी कामाचे वेळापत्रक पुन्हा नियोजित करावे. याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन कार्यवाही करावी. कार्यस्थळी उन्हापासून बचावासाठी पुरेशी व्यवस्था करावी. तसेच सदर ठिकाणी विश्रांती व्यवस्था करावी. आवश्यकतेनुसार कुलर व अनुषंगिक व्यवस्था सुनिश्चित करावी. पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी, इलेक्ट्रोलाइट पूरक पदार्थ, आणि आपत्कालीन आईस पॅक उपलब्ध करून देण्यात यावे. कामगारांच्या नियमित आरोग्य तपासणीसाठी आरोग्य विभागाशी समन्वय साधून करण्यात यावी.

उष्णतेचा ताण जाणवत असल्यास कामगारांना कामाचा वेग कमी करण्यास परवानगी देण्यात यावी.जड कामे दिवसातील थंड वेळेत होतील याबाबत नियोजन करावे.

अत्यंत उष्णतेच्या परिस्थितीत कामासाठी दोन व्यक्तींच्या पथकाची अट लागू करण्यात यावी. कार्यस्थळाजवळ विश्रांतीसाठी जागा उपलब्ध करून देणे आणि थंड पाण्याची व्यवस्था सुनिश्चित करावी. कामगार काम करीत असलेला भाग, ठिकाणे व सार्वजनिक ठिकाणी उष्णतेच्या धोक्यांविषयी जनजागृती मोहिमा राबविण्यात यावी. असुरक्षित गटांवर विशेष लक्ष केंद्रित करावे: बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, दैनंदिन मजूर आणि असंघटित क्षेत्रातील कामगार. जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख व प्रामुख्याने उपसंचालक औदयागिक सुरक्षा, सहायक आयुक्त कामगार कल्याण यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

## बुद्ध पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात होणार वन्य प्राणी गणना

### अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्ह्यातील ३५ मचान सज्ज

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला :** १ मे रोजी बुद्ध पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर चंद्राच्या लक्ख पृरकाशात काटेपूर्णा, कारंजा सोहळ तसेच ज्ञानगंगा अभयारण्यात वन्य प्राणी गणना होणार आहे. यावेळी पर्यटकांना वन्यजीवांचे चित्तथरारक अनुभव घेता येणार आहे. विशेष बाब म्हणजे काटेपूर्णा अभयारण्यात बिबट व अस्वल तर ज्ञानगंगा अभयारण्यात पट्टेदार वाघाचे दर्शन होणार आहे.

अकोला जिल्ह्यात वन्य प्राण्यांची गणना करण्यासाठी वन्यजीव विभागाने तयारी पूर्ण केली आहे. बुद्ध पौर्णिमेच्या रात्री चंद्रप्रकाशात अभयारण्यातील विविध पाणवठ्याजवळील मचाणवर पर्यटक व वन कर्मचारी राहतील. अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा अभयारण्य, वाशिम जिल्ह्यातील कारंजा सोहळा तर बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यात प्राणी गणना होणार आहे. काटेपूर्णा अभयारण्यातील नऊ मचाणवर, कारंजा च्या सोहळ अभयारण्यातील पाच मचाणवर तर ज्ञानगंगा अभयारण्यातील एकविस मचाण सज्ज आहे. या ठिकाणी वन्यजीव प्रेमी तसेच वन कर्मचाऱ्यांना वन्य प्राण्यांची दर्शन मोठ्या प्रमाणात होणार आहे.

सध्या जिल्ह्याचा उन्हाचा पारा हा ४६ डिग्री सेल्सियस पर्यंत पोहोचला असून उष्णतेची लाट पाहता वन्यजीव विभागाकडून वन्य प्राण्यांच्या गणनेमध्ये सहभागी होणाऱ्यांची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. अकोला, वाशिम तसेच बुलढाणा जिल्ह्यातील एकूण ३५ कृत्रिम तसेच नैसर्गिक पाणवठ्यांवर सज्ज करण्यात आलेल्या मचानवर प्राणी गणना केली जाईल. यावर्षी विशेष पर्वणी म्हणून ज्ञानगंगा अभयारण्यात नव्याने दाखल झालेल्या पीकेटी७- सीपी१ या वाघाचे दर्शन होणार असून काटेपूर्णा अभयारण्य मधील बिबट तसेच अस्वलाचे चित्त थरारक अनुभव सुद्धा पर्यटकांना मिळणार असल्याची माहिती वन अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## अकोल्यात महाराष्ट्र दिन साजरा करण्यासाठी तयारी पूर्ण

### पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत मुख्य शासकीय कार्यक्रम होणार



प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला:** अकोल्यात महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा करण्यासाठी तयारी पूर्ण झाली आहे. मुख्य शासकीय कार्यक्रम पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडणार असून शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्य शासकीय कार्यक्रम पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडणार असून ध्वजारोहण, संचलन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी प्रशासनाने विशेष तयारी केली आहे. शहरातील प्रमुख शासकीय इमारती, चौक आणि कार्यक्रम स्थळे सजवण्यात आली असून सुरक्षा व्यवस्थाही कडक करण्यात आली आहे.कामगार दिनानिमित्त कामगारांच्या हक्कांबाबत जनजागृती कार्यक्रम तर महाराष्ट्र दिनानिमित्त राज्याच्या विकासाचा आढावा घेणारे उपक्रम राबवले जाणार आहेत. दरम्यान, मोठ्या संख्येने नागरिकांनी या कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# खंडाळा घाटातील खून-लुट प्रकरण; मुख्य आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ३० एप्रिल



**पुसद** : खंडाळा घाट परिसरात घडलेल्या खून व लुटीच्या थरारक प्रकरणाचा छडा लावत वसंतनगर पोलिसांनी फरार मुख्य आरोपीस अखेर जेरबंद केले. पोलिसांच्या या शिताफीच्या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

प्रकाश उर्फ पक्या उत्तम राठोड (वय ३५ वर्षे, रा. संत सेवादास नगर, पुसद) याचा असे आरोपीचे नाव आहे.

दि. २५ एप्रिल २०२६ रोजी पुसद-वाशिम मार्गावरील संत सेवादास नगर शिवारात एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला होता. दगडाने ठेचून खून करून लुट करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) पुसद, जि. यवतमाळ यांनी तपास करून यापूर्वी एका आरोपीस अटक केली होती.

दरम्यान, फरार मुख्य आरोपीच्या शोधासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक गठीत करण्यात आले. बाहेर जिल्ह्यात जाऊन तपास करण्यास परवानगी देण्यात आली होती. ठाणेदार यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक सुगत पुंडगे यांना पथकासह रवाना करण्यात आले. तपासादरम्यान आरोपी प्रकाश उर्फ पक्या उत्तम राठोड (वय ३५ वर्षे, रा. संत सेवादास नगर, पुसद) याचा हिंगोली, परभणी व वाशिम जिल्ह्यात शोध घेण्यात आला. अखेर दि. २९ एप्रिल २०२६ रोजी खंडाळा घाट परिसरातील जंगलातून आरोपीस ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधीक्षक हर्षवर्धन बी.जे. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुगत पुंडगे, सहाय्यक फौजदार अशोक चव्हाण, पोलीस हवालदार सुरेश राठोड, विजय ठाकूर, गोपाल ठाकूर, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद पवार, सुनील मोरे व चालक देवानंद गायकवाड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुगत पुंडगे करीत आहेत.

# अवैध सावकारी : सहकार विभागाची धाड, 5 कागदपत्रे जप्त

प्रतिनिधी ३० एप्रिल



**यवतमाळ** : खानगाव येथे अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाने धडक कारवाई करत एका महिलेच्या घरावर झडती टाकून आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त केली. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांच्या आदेशानुसार सावकारी पथकाने मंगळवारी (दि. २९ एप्रिल) अलका नारायण गुजर (रा. खानगाव, ता. जि. यवतमाळ) यांच्या राहत्या घरी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत झडती घेतली. या कारवाईदरम्यान सौदेपत्र, खरेदीखत व इतर मिळून एकूण ५ संशयास्पद कागदपत्रे जप्त करण्यात आली.

संजय सवाई पवार यांनी २० एप्रिल रोजी दाखल केलेल्या तक्रारीनुसार संबंधित महिला अवैध सावकारी करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सहकार विभागाने पडताळणी सुरू केली होती. त्यानुसार ही झडती कारवाई करण्यात आली.

या कारवाईचे नियोजन सहाय्यक निबंधक रिता बाळकृष्ण निनावे यांनी केले. पथक प्रमुख म्हणून व्ही. के. हिरूळकर (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दारव्हा) यांनी काम पाहिले. पथकात ए. के. सुरपाम (सहाय्यक निबंधक, दिग्रस), एन. एस. भालेराव (सहकार अधिकारी श्रेणी-२, यवतमाळ), एस. डब्ल्यू. पालकर (सहकार अधिकारी श्रेणी-२, घाटंजी), एस. डब्ल्यू. खरतडे (मुख्य लिपीक, यवतमाळ), एस. डी. मडावी (सहाय्यक सहकार अधिकारी, वणी) आणि के. एस. मारसट्टीवार (सहाय्यक सहकार अधिकारी, यवतमाळ) यांचा समावेश होता.

पंच म्हणून एन. ए. खरोडे (मंडळ अधिकारी, अर्जुना) व आकाश प्रकाश दर्शनवार (ग्राम वसूल अधिकारी, यवतमाळ खंड-२) यांनी काम पाहिले. तसेच पोलीस प्रशासनाकडून विजयमाला रिठे (ए. पी. आय.), उमेश चंदन (ए. एस. आय.), संकेत बोपचे (पोलीस कॉन्स्टेबल) व अभय बोबडे (व्हिडिओ फोटोग्राफर) हे सहभागी होते. ही संपूर्ण कारवाई जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण, तहसीलदार डॉ. योगेश देशमुख व पोलिस निरीक्षक सुनील नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सहकार, महसूल व पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या राबवली असून जप्त कागदपत्रांची सखोल पडताळणी करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# ना. इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे अतिक्रमणधारकांना दिलासा

प्रतिनिधी ३० एप्रिल

**पुसद** : शहरातील अतिक्रमण धारकांसाठी दिलासादायक अशी महत्वाची घडामोड समोर आली असून, राज्यमंत्री श्री. इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न आता मार्गी लागण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अतिक्रमण धारकांना लवकरच "आखीव पत्रिका (नमुना ड)" मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नगर परिषद क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी अतिक्रमण नियमानुकूल करण्याची प्रक्रिया गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होती. या प्रक्रियेत जागेची मोजणी, तसेच नगर रचना नियमावलीनुसार भूखंडांच्या अभिन्यासाला मंजुरी घेणे आवश्यक होते. त्यानुसार पुसद शहरातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण धारकांच्या भूखंडांचे मोजमाप करून अभिन्यास तयार करण्यात आले आणि ते नगर रचना विभागाकडे सादर करण्यात आले होते. यापैकी शिवाजी वार्ड व नवल बाबा वार्ड या दोन वार्डांच्या अभिन्यासाला नगर रचना विभाग, पुणे यांच्याकडून मंजुरी मिळाली आहे. या मंजुरीच्या आधारे संबंधित नागरिकांना आखीव पत्रिका देण्याची प्रक्रिया लवकरचं सुरु होईल. उर्वरित वार्डांबाबतही नियमानुकूल कार्यवाही सुरु असून लवकरच मंजुरी मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, यासंदर्भात प्रतिक्रिया देताना मोहिनी इंद्रनील नाईक यांनी सांगितले की, "नगर परिषद निवडणुकीदरम्यान दिलेला शब्द पाळण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. उर्वरित वॉर्डांमधील कामे देखील लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील." या निर्णयामुळे पुसद शहरातील अनेक कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरण्याच्या उंबरठ्यावर आले आहे. या लोकाभिमुख आणि लोकहिताच्या निर्णयासाठी घरकुल लाभार्थ्यांच्या वतीने मोहिनी नाईक ह्यांनी महसूल मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे आणि महसुल विभागाचे आभार व्यक्त केले तसेच मंजुरी भेटलेल्या अभिन्यासातील लाभार्थी आता प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र असतील अशी माहिती नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी दिली.

# बारा ग्रामपंचायत पोटनिवडणूक; बबन चोपडे यांचा दणदणीत विजय

प्रतिनिधी ३० एप्रिल



**उमरखेड** : तालुक्यातील बारा ग्रामपंचायतीतील एका जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत ग्रामविकास पॅनलचे बबन चोपडे यांनी १०५ मतांच्या फरकाने विजय मिळवत वर्चस्व कायम राखले. या निकालातून ग्रामविकासाच्या मुद्द्यांवर मतदारांनी पुन्हा एकदा कौल दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

मंगळवारी (दि. २८ एप्रिल) पार पडलेल्या या निवडणुकीत एकूण २८३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामध्ये बबन चोपडे यांना १९३ मते मिळाली, तर प्रतिस्पर्धी उमेदवार रत्नमाला रामराव नरवाडे यांना ८८ मते मिळाली. या विजयामुळे ग्रामविकास पॅनलचे गावातील वर्चस्व अधोरेखित झाले असून, कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. या यशासाठी पॅनलमधील विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतल्याचे सांगण्यात आले.

**नाराजीचा फटका विरोधकांना?**

■ ग्रामपंचायत कारभाराबाबत गावात नाराजी असल्याची चर्चा होती. घरकुल योजना, नळपुरवठा तसेच अपूर्ण रस्ते कामांमुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढल्याचे बोलले जात होते. या पार्श्वभूमीवर विरोधी पॅनलला मतदारांनी नाकारल्याची चर्चा गावात रंगत आहे.

# चौकीदार भरतीत आदिवासींना डावलले

प्रतिनिधी ३० एप्रिल

**प्राधान्य देण्याची मागणी**



**पुसद** : आदिवासी विकास विभागांतर्गत सुरू असलेल्या चौकीदार पदभरतीत आदिवासी समाजासाठी एकही जागा राखीव नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या भरती प्रक्रियेत आदिवासींना प्राधान्य द्यावे, अशी मागणी पुसद तालुका अध्यक्ष सुरेश सिडाम यांनी केली आहे.

आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांच्या अधिपत्याखालील २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतील आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये ४१६ चौकीदार पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे. मात्र, या भरतीत अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्र आरक्षण नसल्याचे समोर आले आहे.

याबाबत सुरेश सिडाम यांनी संताप व्यक्त करत, "आदिवासी विकास विभागाच्या भरतीतच आदिवासी समाजाला संधी न मिळणे हा गंभीर अन्याय आहे," असे म्हटले. आदिवासी समाजातील सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत असताना अशा प्रकारच्या भरतीमुळे त्यांच्यात नाराजी वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन बिंदू नामावलीनुसार अनुसूचित जमातीला आठव्या क्रमांकावर स्थान दिल्यामुळे लहान संवर्गातील भरतीत त्यांना संधी मिळत नसल्याचे दिसून येत आहे. पूर्वीच्या शासन निर्णयानुसार चार पदांच्या भरतीत किमान एक पद अनुसूचित जमातीस दिले जात होते; मात्र सध्याच्या धोरणामुळे हे प्रमाण घटल्याची भावना व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास मंत्र्यांनी हस्तक्षेप करून धोरणाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी पुसद येथील उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मंत्र्यांना निवेदन देण्यात आले. या वेळी विविध आदिवासी कार्यकर्ते उपस्थित होते.

# उष्णतेने उमरखेडमध्ये जनजीवन विस्कळीत

प्रतिनिधी ३० एप्रिल

**उमरखेड** : तालुक्यात उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून नागरिक हैराण झाले आहेत. हवामान खात्याने पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याचा अंदाज वर्तविल्याने नागरिकांमध्ये चिंता आहे. शेती कामांवर मोठा परिणाम झाला आहे.

शेतकरी व मजूर सकाळी लवकर कामाला सुरुवात करीत असले, तरी उष्णतेचा तडाखा वाढल्याने सकाळी ११ वाजेपूर्वीच कामे थांबवावी लागत आहेत. दुपारी बाहेर पडणे धोकादायक ठरत आहे.

# वनाग्नी की 'पालापाचोळा'? अहवालावर संशय



प्रतिनिधी ३० एप्रिल

**महागाव** : तालुक्यातील काळी दौलत खान वनपरिक्षेत्रातील पिंपळगाव–सारकिनी परिसरात लागलेल्या आगीच्या घटनेवरून प्रशासनाच्या अहवालाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुमारे दोन ते अडीच हेक्टर क्षेत्र आगीत जळून खाक झाले असतानाही "केवळ पालापाचोळा जळाला" असा अहवाल सादर करण्यात आल्याने स्थानिकांमध्ये संभ्रम व नाराजी व्यक्त होत आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या मते, आगीत अनेक झाडांचे नुकसान झाले असून काही झाडे पूर्णपणे जळून नष्ट झाली आहेत. मात्र अधिकृत नोंदीत नुकसान नगण्य दाखवले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. घटनेनंतर पंधरा दिवस उलटूनही स्पॉट पंचनामा न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, वृक्षलागवड मोहिमेअंतर्गत या परिसरात मोठ्या प्रमाणावर लागवड झाल्याचे यापूर्वी दर्शविण्यात आले होते. त्यामुळे झाडे अस्तित्वात होती का, आणि असल्यास त्यांचे नुकसान का नोंदवले गेले नाही, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांकडून आग लागण्याचे कारण स्पष्ट करण्यात आलेले नसून, काही प्रमाणात झाडे जळाल्याची कबुली देण्यात आली आहे. मात्र नुकसानाचे नेमके स्वरूप अद्याप अस्पष्ट आहे. स्थानिक नागरिकांनी या घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांकडून नुकसानभरपाई वसूल करण्याचीही मागणी पुढे येत आहे.

# माथार्जुनमध्ये निर्मला कुमरे सरपंचपदी

प्रतिनिधी ३० एप्रिल

**झरी** : तालुक्यातील माथार्जुन गावात थेट सरपंच पदासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत निर्मला जलपत कुमरे यांनी ३१ मतांनी विजय मिळवित सरपंचपद पटकावले. त्यांनी प्रतिस्पर्धी प्रमिला पुंडलिक मसराम यांचा पराभव केला.

दि. २८ रोजी पार पडलेल्या मतदानात एकूण २०६५ मतदारांपैकी १५२७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. प्रभाग क्रमांक १ मध्ये ४७२, प्रभाग क्रमांक २ मध्ये ५४९ तर प्रभाग क्रमांक ३ मध्ये ५०६ मतदानाची नोंद झाली. दि. २९ रोजी झालेल्या मतमोजणीत प्रभागनिहाय चुरस पाहायला मिळाली. प्रभाग क्रमांक १ मध्ये निर्मला कुमरे यांना १८८ मते, प्रमिला मसराम यांना १७८ तर उज्वला तुमराम यांना ९८ मते मिळाली. प्रभाग क्रमांक २ मध्ये प्रमिला मसराम आघाडीवर राहिल्या; त्यांना २७५ मते मिळाली, तर निर्मला कुमरे यांना २०८ आणि उज्वला तुमराम यांना ५० मते मिळाली. प्रभाग क्रमांक ३ मध्ये निर्मला कुमरे यांनी २३७ मते मिळवत आघाडी घेतली, तर प्रमिला मसराम यांना १४९ आणि उज्वला तुमराम यांना १११ मते मिळाली. एकूण मतांमध्ये निर्मला कुमरे यांना ६३३, प्रमिला मसराम यांना ६०२ तर उज्वला तुमराम यांना २५९ मते मिळाली. याशिवाय ३३ मतदारांनी 'नोटा'चा पर्याय निवडला. या विजयामुळे माथार्जुन गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.



# आंतरजातीय विवाह सोहळ्याने दिला समतेचा संदेश

प्रतिनिधी ३० एप्रिल



**उमरखेड** : येथील एका आंतरजातीय विवाह सोहळ्याने सामाजिक सलोखा आणि समतेचा संदेश अधोरेखित केला आहे. भिन्न सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या दोन कुटुंबांनी एकत्र येत हा विवाह पार पाडत समाजासमोर प्रेरणादायी उदाहरण ठेवले.

रविवार (दि. २६ एप्रिल) रोजी राजस्थानी भवन येथे माधव संजय तिवारी (रा. चौभारा चौक) आणि मनिषा कुमार केंद्रेकर (रा. उमरखेड) यांचा विवाह संपन्न झाला. बौद्ध व हिंदू या दोन्ही परंपरांचा सन्मान राखत विवाह विधी पार पाडण्यात आले. प्रारंभी बौद्ध धम्मानुसार त्रिसरण व पंचशील ग्रहण करण्यात आले, तर सायंकाळी हिंदू वैदिक पद्धतीनुसार सोहळा झाला. या प्रसंगी दोन्ही समाजातील नागरिक, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी नवदांपत्यास शुभेच्छा देत या उपक्रमाचे स्वागत केले.

डॉ. खेमधम्म महाथेरो यांनी, "सामाजिक एकात्मता कृतीतून दिसली पाहिजे. आंतरजातीय विवाह हे भेद दूर करण्याचे प्रभावी माध्यम आहे," असे सांगितले. दरम्यान, वधू-वर हे दोघेही उमरखेडमधील खासगी बँकेत कार्यरत असून, त्यांच्या निर्णयामुळे तरुण पिढीत सकारात्मक विचारांना चालना मिळेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

# विद्यार्थ्यांसाठी अग्निशामक प्रशिक्षण




प्रतिनिधी ३० एप्रिल


**पुसद** : हाजी अख्तर खान नगर परिषद उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, पुसद येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित समर कॅम्पमध्ये विविध उपक्रमांद्वारे सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि. २८ एप्रिल २०२६) अग्निशामक दलाकडून विद्यार्थ्यांना आग नियंत्रण व आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षितता कशी राखावी याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात आग लागल्यास तत्काळ करावयाच्या उपाययोजना, अग्निशामक उपकरणांचा योग्य वापर तसेच स्वतःचे आणि इतरांचे प्राण कसे वाचवावेत, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमुळे विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक स्पष्टपणे समजल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल होते.

प्रमुख अतिथी म्हणून हाजी कौसर खान, मोहसीन सर तसेच प्रभारी मुख्याध्यापक सलीम खान शकूर खान उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. अग्निशामक दलातील वाहन चालक मोहन राठोड, फायरमन अक्षय साबळे आणि तृषाल बारमाटे यांनी प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले. समर कॅम्पमधील हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत असून, अशा प्रशिक्षणामुळे सुरक्षा आणि जागरूकतेची भावना वृद्धिंगत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# वाकोडी रस्त्यावर ट्रॅक्टर पलटी; युवक ठार

प्रतिनिधी ३० एप्रिल



**महागाव** : तालुक्यातील वाकोडी रस्त्यालगत गुरुवारी (दि. ३० एप्रिल) मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला. मंगेश संतोष बेलखेडे (वय २१) असे मृत युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश बेलखेडे हा शेतातून रिकामा ट्रॅक्टर घेऊन गावाकडे परतत असताना रात्री १२ ते १ वाजताच्या दरम्यान त्याचे ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रॅक्टर रस्त्यालगत पलटी झाला. या अपघातात तो ट्रॅक्टरखाली दबला जाऊन गंभीर जखमी झाला. स्थानिकांच्या मदतीने त्याला तातडीने सवना येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

## कागदपत्र हरविले

*अर्जदार :* विशाल लक्ष्मणराव बावनथडे
*पद :* अध्यक्ष, सायली बहुउद्देशीय विकास संस्था
*पत्ता :* विठ्ठलवाडी, संदीप मंगल रोड, यवतमाळ,
मो. क्र. : ९९२१४४४३४४

माझी सायली बहुउद्देशीय विकास संस्था, रजिस्टर नंबर F-0020199 (YVT), विठ्ठलवाडी, संदीप मंगल रोड, यवतमाळ या संस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे प्रमाणपत्र दिनांक 12/02/2026 रोजी हरविले आहे. सदर दिवशी मी संस्थेच्या वार्षिक ऑडिटसाठी लेखापाल यांच्याकडे जात असताना, संदीप मंगल परिसरात माझ्याकडील संस्थेचे मूळ प्रमाणपत्र अनवधानाने हरविले गेले आहे.

मी सदर प्रमाणपत्राचा परिसरात, कार्यालयात तसेच संबंधित ठिकाणी सखोल शोध घेतला असूनही ते अद्याप मिळून आलेले नाही. त्यामुळे हे प्रमाणपत्र हरविल्याची नोंद संबंधित पोलीस ठाणे, यवतमाळ शहर येथे करण्यात आलेली आहे (नोंद क्र. 64/2026, दिनांक 23/02/2026). जर कोणत्याही व्यक्तीस सदर संस्थेचे प्रमाणपत्र सापडले किंवा त्याबाबत माहिती मिळाली तर कृपया ते जवळच्या पोलीस ठाण्यात जमा करावे किंवा खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा, अशी नम्र विनंती करण्यात येत आहे. या प्रमाणपत्राचा गैरवापर होऊ नये म्हणून ही सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

दिनांक :
23/02/2026

**अध्यक्ष / सचिव**
**सायली बहुउद्देशीय विकास संस्था**
**यवतमाळ, जि. यवतमाळ**

## महाराष्ट्र शासन
## धर्मादाय सह आयुक्त कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

## जाहीर नोटीस

अर्ज कं. 09/कलम 47/2026
श्री दत्तात्रय संस्थान अंबाळी ता. उमरखेड जि. यवतमाळ
नों.क.ए-337/ यवतमाळ

अर्जदार :- श्री. सुभाष गंगाराम जाधव विरूध्द गैरअर्जदारः- श्री. प्रकाशराव आबासाहेब साळे (अध्यक्ष)+9

सर्व सबंधित लोकांना कळविण्यात येते की, मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे दिनांक 10/04/2026 रोजीचे आदेशान्वये वरील नमुद न्यासात महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 चे कलम 47 प्रमाणे नवीन विश्वस्तांची नेमणुक करावयाची आहे. सदरच्या न्यासात विश्वस्त होण्यासाठी खालील लोकांनी मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांच्याकडे अर्ज केला आहे. 1. श्री. सुभाष गंगाराम जाधव रा. जनुना पो. पोफळी ता उमरखेड जि. यवतमाळ सदरच्या न्यासात चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयावयाचा असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून 30 दिवसांचे आत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व चौकशी पूर्ण करून अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिल्या जातील. हि नोटीस माझे सहीनीशी व मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दि. 28/04/2026 रोजी काढण्यात आली.

शिक्का

**स्वा./-**
**अधिक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी**
**कार्यालय अमरावती**

सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# सार्वजनिक ठिकाणी दारू पिणाऱ्या विरुद्ध कारवाई

**अमरावती:** आज दिनांक २९.०४.२०२६ रोजी पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे शहरातील कटोरा नाका, किशोर कॉलनी, दस्तुर नगर, शेगाव नाका इंजिनिअरिंग कॉलेज जवळ,सिंधी चौक, चवरे नगर, गर्ल्स हायस्कूल चौक, ऑर्बिट पॉइंट इत्यादी सार्वजनिक ठिकाणी हातगाड्यावर किंवा रस्त्यावर दारू पिऊन असभ्य वर्तन करणाऱ्या ७६ इसमांवर महाराष्ट्र पोलीस कायद्यातील विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. अशा इसमांच्या कृत्यामुळे सामान्य नागरिक व महिलांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने सदरची कारवाई करण्यात आली आहे. यापुढेही गुन्हे शाखा अमरावती शहर व सर्व पोलीस स्टेशन यांच्याकडून या प्रकारच्या कारवाई सतत करण्यात येणार आहेत. शहरातील विविध खाद्यपदार्थांचे हातगाडी चालक व दारू पिणाऱ्या लोकांना जागा उपलब्ध करून देणारे किरकोळ दुकानदार यांच्यावरही कारवाई होणार आहे.

# विदर्भात उष्णतेची लाट; ट्रान्सफॉर्मरलाही फुटला घाम

## ◆ सुरळीत विजेसाठी महावितरणची धडपड, पॉवर ट्रान्सफॉर्मरच्या सुरक्षेसाठी कुलरचा वापर

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती:** विशेषता पश्चिम विदर्भात उष्णतेची लाट पसरली असून तापमानाने ४७ष्ट अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. या तीव्र उष्णतेचा परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होऊ नये आणि ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा मिळावा यासाठी महावितरणने महत्त्वपूर्ण उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्याअंतर्गत उपकेंद्रांतील पॉवर ट्रान्सफॉर्मर थंड ठेवण्यासाठी विशेष कुलर बसविण्यात येत आहेत.



महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्रांमध्ये सामान्यतः एक किंवा दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यरत असतात. या ट्रान्सफॉर्मरची क्षमता साधारणतः ५ किंवा १० एमव्हीए इतकी असल्याने एका ट्रान्सफॉर्मरद्वारे हजारो वीज ग्राहकांना वीज पुरवठा केला जातो. या उपकरणांच्या कार्यक्षमतेसाठी ट्रान्सफॉर्मरमध्ये असलेले ऑइल अत्यंत महत्त्वाचे असते. हे ऑइल उष्णता नियंत्रणासाठी आणि इन्सुलेशनसाठी वापरले जाते.

मात्र, तापमानात लक्षणीय वाढ झाल्यास हे ऑइल अतिउष्ण होऊन त्याचे गुणधर्म बदलू शकतात, ज्यामुळे ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड किंवा ओव्हरहिट होण्याचा, बिघाड होण्याचा किंवा अगदी आग लागण्याचाही धोका निर्माण होतो.

या पार्श्वभूमीवर महावितरणच्या ३३/११ केव्ही उपकेंद्रांमध्ये पॉवर ट्रान्सफॉर्मरला कुलरच्या साहाय्याने ट्रान्सफॉर्मरच्या बाह्य पृष्ठभागावर थंड हवा पुरवून त्यांचे तापमान नियंत्रितान ठेवून संभाव्य बिघाड टाळण्याचे प्रयत्न महावितरणकडून करण्यात येत आहे. शिवाय पॉवर ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाला तर, याचा मोठा फटका हजारो ग्राहकांना आणि जास्त कालावधी साठी पडू शकतो, त्यामुळे पॉवर ट्रॉन्सफॉर्मरला वाचविण्याच्या प्रयत्नात महावितरणची दमछाक होत आहे.

दरम्यान, वाढत्या तापमानाबरोबरच विजेच्या मागणीतही मोठी वाढ झाल्याने संपूर्ण वीज वितरण यंत्रणेवर ताण वाढला आहे. अशा परिस्थितीत महावितरणचे कर्मचारी उष्णतेची पर्वा न करता खंडित वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यामुळे या काळात सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात 'प्लेसमेंट डे'




प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागातर्फे 'प्लेसमेंट डे' उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी महाविद्यालयातील तब्बल ४१५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची विविध बहुराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय सॉफ्टवेअर व कोअर कंपन्यांमध्ये निवड झाली असून, या उल्लेखनीय यशाचा आनंद साजरा करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत आपल्या यशाचा आनंद व्यक्त करत जल्लोष साजरा केला. संपूर्ण परिसरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. महाविद्यालयाच्या व्यवस्थापन व प्राध्यापकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाकडून दिले जाणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम यामुळेच हे यश मिळाल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा यशाची नोंद करावी, अशी अपेक्षा व्यवस्थापनाने व्यक्त केली. या 'प्लेसमेंट डे'मुळे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून, इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली.

# विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी



प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती :** राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. याप्रसंगी वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

# 'मिशन लक्षवेध' अंतर्गत कुस्ती खेळाडूंची फेर निवड चाचणी; ६ मे रोजी आयोजन

## ◆ इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज ३० एप्रिलपर्यंत सादर करावेत

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती:** ऑलिम्पिक स्तरावरील क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने 'मिशन लक्षवेध' ही महत्त्वकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अमरावती जिल्हा स्तरावर 'क्रीडा प्रतिभा विकास केंद्र' स्थापन करण्यात आले असून, कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी २० खेळाडूंची निवड करण्यासाठी येत्या ६ मे २०२६ रोजी फेर निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या चाचणीत जिल्ह्यातील पात्र खेळाडूंना सुवर्णसंधी मिळणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिली आहे.

ही निवड चाचणी ६ मे रोजी सकाळी ८ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे पार पडणार आहे. या खेळाचे आयोजक राहुल निवडंगे (७७७४००१५७९) आहेत. यापूर्वी ९ एप्रिल रोजी चाचणी घेण्यात आली होती, मात्र आता पात्र खेळाडूंसाठी पुन्हा एकदा फेर चाचणीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी २१ वर्षांखालील (३१ डिसेंबर २०२६ रोजी वय ग्राह्य) मुले व मुली पात्र असून, खेळाडू महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. तसेच, संबंधित खेळाडूने गेल्या दोन वर्षांत राज्यस्तरावरील शालेय किंवा अधिकृत क्रीडा संघटनेच्या स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा किंवा पदक प्राप्त केलेले असावे. निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आपला जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला, अधिकृत डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र, आधारकार्ड, क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, पालकांचे संमतीपत्र आणि पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे आवश्यक आहे.

निवड झालेल्या २० खेळाडूंना शासनाच्या वतीने प्रगत प्रशिक्षण दिले जाईल. ही प्रक्रिया अनिवासी स्वरूपाची असली तरी खेळाडूंचा पूरक आहार, गणवेश, क्रीडा साहित्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा प्रवास खर्च, वैद्यकीय उपचार आणि विम्याचा संपूर्ण खर्च मिशन लक्षवेध योजनेअंतर्गत केला जाणार आहे. इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज ३० एप्रिल २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तपोवन चौक, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या निवड चाचणीचे आयोजन क्रीडा कार्यकारी अधिकारी श्रीमती ममता कोळमकर (९८२३७०४३४७) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून, जिल्ह्यातील जास्तीत - जास्त कुस्तीगीरांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'स्वाधार' योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी १० मेपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. १० मेपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील अकरावी, बारावी, तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरू केली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी काही अर्ज कागदपत्रांतील कमतरतेमुळे कार्यालयात प्रलंबित आहेत. या प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे. कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देऊनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रुटी पूर्तता केलेली नाही, ज्यामुळे त्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.

विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रुटी पूर्ण केली नसल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्यांची राहील. तसेच दि. २९ एप्रिल ते १० मे २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ यावेळेत स्वत: उपस्थित राहून त्रुटी पूर्तता करून घेण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अमरावती येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय किंवा दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

# वरुड येथे कौशल्य विकास केंद्राचा रोजगार मेळावा

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे गुरूवार, दि. ३० एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरूड जि. अमरावती येथे हा मेळावा होणार आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येते. मेळाव्यात योजनेसाठी विविध आस्थापना, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे. मेळाव्यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांसह उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६, ८९८३४१९७९९, ८६०५६५४०२५ किंवा amravatiro®ar@gmailed.comed या मेलवर संपर्क साधावा.

# अमरावती एसीबीने १५ हजारांची लाच घेताना कर्मचाऱ्याला पकडले

## ◆ सोलर प्रकल्प नोंदणीसाठी मागितली होती २० हजारांची लाच

प्रतिनिधी ३० एप्रिल

अमरावती: अमरावतीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचत महावितरण कार्यालयातील भ्रष्टाचार उघड केला आहे. सोलर प्रकल्प नोंदणीसाठी लाच मागणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून एकाला रंगेहात पकडण्यात आले आहे.

अमरावती येथील तक्रारदाराने १६ मार्च २०२६ रोजी महावितरणच्या अधीक्षक अभियंता कार्यालयात 'ग्रीन एनर्जी' नावाने सोलर प्रकल्प नोंदणीसाठी अर्ज केला होता. मात्र, ही नोंदणी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी सुरुवातीला २० हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार करण्यात आली.यानंतर २८ एप्रिल रोजी एसीबीने पडताळणी केली असता ही लाच १५ हजार रुपयांवर ठरवण्यात आल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार सापळा रचण्यात आला.सापळा कारवाईदरम्यान कॉम्प्युटर ऑपरेटर श्याम कुमार इझाटे यांनी १५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबी पथकाने त्यांना रंगेहात पकडले. या प्रकरणात उपकार्यकारी अभियंता बाळासाहेब खंडारे यांचाही सहभाग समोर आला आहे.

कारवाईदरम्यान आरोपीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून घरझडतीची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणी गाडगे नगर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस उपअधीक्षक मंगेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य

## २० मेपर्यंत नोंदणीचे आवाहन

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती :** राज्यात दि. १४ नोव्हेंबर २०२४ पासून ॲग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, दि. १५ एप्रिल २०२५ पासून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या शेतकरी बांधव-भगिनींनी अद्याप फार्मर आयडी काढलेला नाही, त्यांनी दि. २० मेपर्यंत नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

राज्यात एकूण १.७१ कोटी खातेदार असून त्यापैकी १.३२ कोटी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी नोंदणी पूर्ण केली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी २० मे २०२६ पूर्वी आपला फार्मर आयडी तयार करून घ्यावे. शेतकरी नजिकच्या सेवा सुविधा केंद्रावर जाऊन अथवा स्वतः ॲग्रीस्टॅक पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करू शकतात. यापुढे कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच बियाणे, खते, औषधे आदी कृषी निविष्ठा प्राप्त करण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक राहणार आहे.

फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात काही अडचण आल्यास संबंधित विभागाच्या हेल्पडेस्कशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अमरावती विभागासाठी अजितकुमार गेजगे (९६५७१०९८०९), पुणे विभाग करिता संगीता ननावरे (७५८८५०९४९२), कोकण विभागसाठी सोनाली वाडेकर (९४०४९५३५१८), छत्रपती संभाजीनगर विभाग शीतल कौदरे (९१७२३१९६३७), नागपूर विभाग अजितकुमार गेजगे (९६५७१०९८०९) व नाशिक विभाग सोनाली वाडेकर (९४०४९५३५१८) यावर संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाव्दारे करण्यात आले आहे.

# खतांचा काळाबाजार आणि लिंकिंग रोखण्यासाठी कारवाई

## १० कृषी केंद्रांचे परवाने निलंबित, तर ६ केंद्रांना सक्त ताकीद

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती:** खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची फसवणूक थांबवण्यासाठी आणि कृषी निविष्ठांची गुणवत्ता राखण्यासाठी अमरावती जिल्हा कृषी विभागाने जिल्ह्यात मोठी कारवाई आहेत. धडक मोहिम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १० कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, त्रुटी आढळलेल्या इतर ६ केंद्रांना प्रशासनाने कडक ताकीद दिली आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी दिली आहे.

खरीप हंगामात बोगस बियाणे, खते आणि कीटकनाशकांची विक्री होऊ नये, तसेच शेतकऱ्यांकडून छापील किमतीपेक्षा जास्त दराने वसुली केली जाऊ नये, यासाठी जिल्ह्यात भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. एप्रिल २०२६ अखेरपर्यंत जिल्ह्यातील १०० टक्के कृषी निविष्ठा केंद्रांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट विभागाने ठेवले आहे. ज्या केंद्रांच्या ई-पॉस मशीनवरील खतांचा साठा आणि दुकानातील प्रत्यक्ष साठा यामध्ये मोठी तफावत आढळून आली, अशा १७ विक्रेत्यांची जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीअंती दोषी आढळलेल्या १० विक्रेत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईमध्ये प्रामुख्याने साठ्यात तफावत असणे, अवाजवी दराने विक्री करणे, पक्के बिल न देणे, अनधिकृत बियाण्यांची साठवणूक करणे आणि बंदी असलेल्या एच.टी.बी.टी. कापूस बियाण्यांची विक्री करणे यांसारख्या गंभीर बाबी कारणीभूत ठरल्या आहेत.

कृषी विभागाने शेतकरी बांधवांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. बियाणे किंवा खते खरेदी करताना केवळ अधिकृत परवानाधारकांकडूनच खरेदी करावी आणि त्याचे पक्के बिल आवर्जून घ्यावे. जर कोणत्याही केंद्रावर खतासोबत इतर अनावश्यक उत्पादने (लिंकिंग) घेण्याची सक्ती केली जात असेल किंवा अवाजवी दर आकारले जात असतील, तर शेतकऱ्यांनी ८०८०५३६६०२ या व्हॉट्सॲप क्रमांकावर किंवा तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे तात्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# जिल्हा युवा पुरस्कार जाहीर; महाराष्ट्र दिनी होणार मान्यवरांच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अमरावती:** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील युवक, युवती आणि संस्थांचा गौरव करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणारे सन २०२४-२५ व २०२५-२६ चे 'जिल्हा युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. हे पुरस्कार १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस मुख्यालय, अमरावती येथील प्रांगणात आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहेत. राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या शुभहस्ते आणि वरिष्ठ सनदी अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत हा वितरण सोहळा पार पडणार असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.

सन २०२४-२५ या वर्षासाठी 'विशेष जिल्हा युवा पुरस्कार' नाळ चित्रपट फेम बालकलाकार श्रीनिवास गणेश पोकळे याला जाहीर झाला आहे. श्रीनिवासने आपल्या अभिनयाने दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळवून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. याच वर्षासाठी युवक गटातून अमर पुरुषोत्तम वानखडे (तिवसा), युवती गटातून कु. जानव्ही राउत (नया वाठोडा) तसेच संस्था गटातून श्री. संताजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था (गुरुकुंज आश्रम) यांची निवड करण्यात आली आहे. या सर्वांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रचार, व्यसनमुक्ती, रक्तदान आणि आदिवासी विकास क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे.

सन २०२५-२६ या वर्षासाठी युवक गटात समाजप्रबोधनकार वेदांत मुंदाने (अमरावती), युवती गटात कु. पुजा गुंजरकर (ब्राम्हणवाडा थडी) आणि संस्था गटात स्वामी विवेकानंद विचार मंच (अचलपूर) यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. वेदांत मुंदाने यांनी कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले आहे, तर पुजा गुंजरकर यांनी स्वसंरक्षण प्रशिक्षण आणि पर्यावरण क्षेत्रात योगदान दिले आहे. अचलपूरच्या विवेकानंद विचार मंचने आरोग्य सेवा आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले आहे. युवक व युवती पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व १० हजार रुपये रोख, तर संस्था पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व ५० हजार रुपये रोख असे आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि ३० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# पदभरतीची बंदी, संस्थाने साधली संधी !

* रक्ताच्या नात्यातील १० लोकांची नियुक्ती; अल-हिलाल च्या संस्थातेली प्रकार
* माध्यमिक शिक्षण विभागाच्या कृपादृष्टीने कथित सचिवाची भरभराट
* शिक्षण विभागातील झारीतील शुक्राचार्याच्या संगनमताने नियमबाह्य नियुक्त्या
* अन्यायग्रस्त रमीज खान व अलीम खान यांची एसआयटीकडे तक्रार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

रिसोड येथील गैरप्रकारात आघाडीवर असलेल्या अल- हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण प्रसारक व समाज कल्याण संस्थेच्या कथित सचिवाने त्या संस्थेद्वारा संचालीत प्राथमिक,माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये शासनाचे पदभरतीबाबतची बंदी असतानाही वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागातील तत्कालीन भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने आपल्या रक्तातील नात्यातील १० लोकांची नियमबाह्य नियुक्ती केल्याचा आरोप तक्रारकर्ते रमीज खान व अकील खान यांनी शिक्षण विभागातील गैरप्रकारासह बोगस शालार्थ आयडी घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या एसआयटी प्रमुखासह राज्याच्या अल्प संख्यांक आयोगाच्या अध्यक्षांना दिलेल्या तक्रारीत आरोप केला आहे.



रिसोड येथील अल-हिलाल संस्थेच्यावतीने रिसोड शहरात डॉ.अल्लमा ईकबाल उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज आणि प्रायमरी स्कूल चालविल्या जाते. या दोन्ही शाळांना अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त आहे.राज्यात नोकरबंदी असतानाही या संस्थेच्या कथित सचिवाने शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियमबाह्य स्वत:च्या मुला,मुलींसह रक्त संबंधातील अनेक व्यक्तींच्या बेकायदेशीर नियुक्त्या केल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी वरिष्ठांना दिलेल्या तक्रारीत केला आहे.या संस्थेत संस्था सचिवाचे दोन मुले,तिन मुली,दोन पुतणे,एक मेहुण्याची मुलगी व जवळच्या आप्तेष्ठांना रोजगार प्राप्त झाला असल्याची बाबही निवेदनात नमूद केलेली आहे. संस्थाचालकांनी आप्तेष्ठांच्या केलेल्या नियमबाह्य व बेकायदेशीर असलेल्या सर्व नियुक्त्यांची आणि पदभरती बंद असताना केलेल्या अनियमिततेची सुद्धा सखोल चौकशी करून सर्व दोषींवर शासनाने फौजदारी कारवाई करण्याची मागणी या निवेदनाद्वारे रमीज खान व अकील खान यांनी वरिष्ठांकडे केली आहे.

### 'त्या' तक्रारीची सखोल चौकशी व्हावी

रिसोड येथील अल-हिलाल संस्थेचे सचिव कबीर मोहसीन शेख अहेमद यांनी रिसोडच्या एका शाळेत उर्दू शिक्षक म्हणून नोकरी केली.परंतु त्या गुरूजींनी संस्थाचालकांची हुजरेगिरी करून हाजी-हाजी करण्यासाठी प्राधान्य दिले. आणि रिसोड शहरातच आपली दुकानदारी सुरु केली. या दुकानदारीतून कथित संस्था सचिवाने मुस्लीम समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करून स्वत:ची भरभराट केल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी वरिष्ठांकडे दिलेल्या तक्रारीत केला आहे. आता माध्यमिक शिक्षण विभागातील कार्यरत अधिकारी तक्रारकर्त्यांच्या गंभीर तक्रारीची दखल घेतात की पुन्हा कथित सचिवाला 'क्लिनचिट' देवून स्वत: आर्थिकदृष्ट्या संपन्न होतात याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.



# वाशीम जिल्ह्यात... १० नंबर बटन गोळी, जीवनाची करते होळी !

## *गोळ्याची सर्रास विक्री जिल्ह्यात ; *अल्पवयीन, तरुण मुले व्यसनाच्या विळख्यात

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम शहरासह जिल्ह्यात १० नंबर (बटन) नावाच्या नशेच्या गोळीची सर्रास विक्री होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. शहरातील गल्ली-बोळापासून काही प्रमुख भागांपर्यंत ही गोळी सहज उपलब्ध होत असून शाळा ,महाविद्यालयात शिकणारे तरूण मुले या नशेच्या विळख्यात अडकले आहेत. या नशायुक्त गोळयांमुळे तरूण मुलांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत असल्याची शहरात चर्चा आहे. तसेच अनेक गंभीर गुन्हे करण्याआधी गुन्हेगार या गोळीचा नशा करतात अशीही धक्कादायक माहिती समोर येत आहे.त्यामुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून या गोळया विकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### १० नंबर (बटन) गोळीच्या नशेत घडले गंभीर गुन्हे !

वाशीम शहरात गेल्या काही काळात घडलेल्या काही गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपींनी १० नंबर (बटन) गोळीचा नशा केल्याची माहिती समोर आली आहे. नशेच्या अवस्थेत आरोपींकडून खून, मारहाण, दहशत निर्माण करणे तसेच इतर गुन्हे घडल्याचे अनेक चित्र आहे. त्यामुळे या गोळीच्या वाढत्या विक्रीवर आणि व्यावसायिकांकडे पोलिस प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी जोर धरत आहे.

### पालकमंत्री महोदय, तुम्ही तरी याकडे लक्ष द्या..!

वाशीम जिल्ह्यात १० नंबर (बटन) गोळयांची खुलेआम विक्री होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. यापूर्वी जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्या जिल्हा दौऱ्यावेळी पत्रकार परिषदेत पत्रकारांनी ही गंभीर बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती.त्यावेळी अशा बेकायदेशीर व्यवसायावर कठोर कारवाईचे आदेश स्वतः पालकमंत्र्यांनी दिले होते. मात्र अद्यापपर्यंत पोलिसांकडून यावर संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.दरम्यान पालकमंत्री पुन्हा जिल्हा दौऱ्यावर येत असून आता तरी त्यांनी या गंभीर प्रश्नाकडे स्वतः लक्ष देऊन नशायुक्त गोळयांचा व्यवसाय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी जिल्हावासीयांकडून होत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वाशीम जिल्ह्यातील तालुका स्तरावर आणि वाशीम शहरातील खामगाव जीन परिसर, शुक्रवार पेठ तसेच इतर अनेक भागांमध्ये १० नंबर (बटन )या नशायुक्त गोळीची खुलेआम विक्री सुरू आहे. एमडी ड्रग्सपेक्षाही अधिक नशा देणारी ही गोळी असून मोठ्या प्रमाणात युवक या गोळीच्या आहारी जात आहेत.विशेष म्हणजे, अल्पवयीन मुले तसेच शाळा-महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थीही या गोळीच्या व्यसनाच्या विळख्यात अडकत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.या गोळयांचे व्यसन लागल्याने अल्पवयीन आणि तरुणपीढीचे आरोग्य धोक्यात आले असून युवापीढीच्या जीवनाची होळी होत आहे. या नशायुक्त एका गोळीची किंमत सुमारे १२० रुपये असून या गोळीचा पूर्णपत्ता १२०० रुपयांना विकला जात असल्याची चर्चा आहे.मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये गंभीर गुन्हे करण्यापूर्वी गुन्हेगार या गोळीच्या नशेचा वापर करतात. आता तोच नशा वाशीम जिल्ह्यात पोहोचल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात हा अवैध व्यवसाय सुरू असताना पोलिस प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या प्रकरणात तातडीने कठोर कारवाई करावी अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.मात्र आता तरी या नशेच्या जाळ्यावर पोलिस प्रशासन कारवाई करणार का ? असा सवाल आता सर्वसामान्य नागरिकांकडून विचारला जात आहे.

## थोडक्यात

### घोटा येथे बाल संस्कार शिबीराचे आयोजन

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

पांडुरंगाच्या कृपेने विश्वमाऊली ज्ञानोबाराय व सर्व संत महंत यांच्या आशीर्वादाने यावर्षी घोटा येथे सुरू होत असलेले बाल संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. आजच्या आधुनिक युगामध्ये समाज जीवनावर वाईट संस्कृतीचा वाढणारा प्रभाव धावपळीच्या जीवनात मुलाकडे होणारे दुर्लक्ष त्यामुळे घराघरांमध्ये लहान मुले अनेक वाईट सवयीच्या आहारी जातात आई वडिलांना मानत नाहीत अशा मुलांमधून उद्याची घडणारी भावी युवा पिढी पूर्व उद्योग गतीला जाण्याचा धोका असून तो थांबविण्यासाठी फक्त एकच अध्यात्म आहे. संस्कार वर्गांची नितांत गरज आहे. लहान मुले उद्याच्या पिढीमध्ये वाईट व्यसनांच्या आधी जाऊ नये म्हणून असे बाल संस्कार शिबिर होणे गरजेचे आहे. उद्याच्या तरुण पिढीने महाराष्ट्राची संस्कृती संभाळण्यासाठी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून ह.भ.प. अमोल महाराज कदम यांनी शिबिराचे आयोजन केले आहे.प्रारंभ १४/५/२०२६ ते २४/५/२०२६ समारोप मे आणि या शिबिरामध्ये १२ते २० वयोगटातील सर्व मुलांना प्रवेश मिळेल. एक वेळ नाष्टा, दोन वेळ जेवण, आणि राहण्याची उत्तम व्यवस्था तसेच अध्यात्मिक शिक्षण देण्यात येणार आहे.बलखांम व योगा आसन: लाठी/ काठी चे शिक्षण देण्याची या कलियुगामध्ये शिक्षणाबरोबर अध्यात्मिक शिक्षण व सांप्रदायिक संस्कार ही काळाची गरज आहे. समाजामध्ये आपण बिघडलेली तरुण पिढी व्यसनाच्या आहारी गेलेली पिढी आई वडिलांचा मान न ठेवणारी आपण बघत आहोत. आई वडिलांचा मान ठेवणारी पिढी घडविण्याकरिता घोटा येथे गुरुवर्य श्री रमेश महाराज गोरे यांच्या प्रेरणेने घोटा येथे बाल संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पंचकोशीतील मंडळींनी या शिबिराच्या आवश्यक लाभ घ्यावा असे आव्हान ह.भ.प अमोल महाराज कदम यांनी केली आहे.

### महाराष्ट्रदिनी आंदोलन, रोजगार सहाय्यक करणार उपोषण



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत असलेले ग्राम रोजगार सहाय्यक यांचे विविध मागण्यासाठी गेल्या ३० मार्च पासून काम बंद आंदोलन सुरू आहे. मात्र शासन दरबारी अद्यापही कुणी दखल घेतली नसल्याने जिल्ह्यातील रोजगार सहाय्यकांनी १ मे महाराष्ट्रदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. या बाबत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

ग्राम स्तरावरील ग्राम रोजगार सहायक हे पद मुळात शेतकरी आणि शासन प्रशासन यांच्यामधील विकास कामांसाठीचा दुवा असून ग्रामरोजगार सहायक यांच्याकडून शासन शेतकऱ्यांसाठी शेतमजुरांसाठी अनेक प्रकारची कामे करून घेते मात्र त्यांना उपाशी ठेवते ही शासनाची धोरण आता ग्राम रोजगार सहाय्यक कदापि सहन करणार नाही त्यामुळे हे आंदोलन अधिक तीव्र होणार असल्याचे जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना म्हटले आहे वाशिम जिल्ह्यातील ग्राम रोजगार सहायक १ मेला शेकडोच्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवस लाक्षणिक उपोषणाला बसणार आहेत सदर निवेदनावर जिल्ह्यातील जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि बहुसंख्य ग्राम रोजगार सहाय्यकांच्या सह्या आहेत

# कृषीमंत्र्याचा पालक जिल्हा, विमा कंपनीने मारला डल्ला !

## करोडो रुपये केले संचित, तरीही बळीराजा पिक विम्यापासून वंचित

● वसंत खडसे @ वाशीम●

राज्याच्या कृषिमंत्र्याचा पालक जिल्हा असूनही जिल्ह्यातील लाखों शेतकऱ्यांवर पिक विम्यापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. सन २०२५ च्या खरीप हंगामात जिल्ह्यातील लाखों शेतकऱ्यांनी पिक विम्यापोटी करोडो रुपये भरले आहेत. मात्र विमा कंपनीने ही रक्कम केवळ संचित करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विम्यापासून वंचित ठेवले आहे. तांत्रिक मुद्द्यांचा आधार घेत विमा कंपनीने कोट्यवधींचा डल्ला मारल्याचा गंभीर आरोप शेतकरी करत आहेत.





नैसर्गिक संकटाचा पिच्छा करता करता जिल्ह्यातील शेतकरी मेटाकुटीस आले असून नुकसान भरपाई म्हणून मिळणाऱ्या पिक विम्याची आशा आता धूसर झाली आहे. सन २०२५-२६ च्या खरीप हंगामात अतिवृष्टीने जिल्ह्यात थैमान घातले होते. या गंभीर संकटात केवळ शेत पिकांची नासाडीच नव्हे; तर हजारो हेक्टर क्षेत्राफळ खरडून जाऊन जमीन उध्वस्त झाली आहे. हे चित्र प्रसार माध्यमांनी उजागर केल्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार दत्तात्रय भरणे मामा यांनी तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी देखील केली होती. शिवाय प्रशासनाकडून जिल्हाधिकारी हे सुद्धा जिल्ह्याचा कानाकोपरा धुंडूण आले होते. त्यामुळे यावर्षीच्या नुकसान भरपाईपोटी पिक विमा हमखास मिळेल अशी आशा शेतकऱ्यांना वाटत होती. तथापि राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार दत्तात्रय भरणे यांनी दस्तुरखुद झालेले नुकसान स्वतः पाहिले होते. त्यांच्या समवेत प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा ताफा देखील होता हे सर्वश्रुत आहे. एव्हढे असूनही जिल्ह्यातील केवळ एक कृषी मंडळ वगळता विमा कंपनीने लाखों शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. परिणामी विम्यापासून वंचित असलेले नुकसानग्रस्त शेतकरी संताप व्यक्त करत असून कृषिमंत्र्याचा पालक जिल्हा तरीही इथल्या बळीराजाला वाऱ्यावर सोडले हे सत्तेत असलेल्या महायुतीच्या मातब्बर नेत्यांसाठी लज्जास्पद असल्याचे सर्व सामान्य नागरिक बोलत आहेत.

मागील वर्षी राज्यात दुसऱ्या क्रमांकाची सतत अतिवृष्टी झाली ती वाशिम जिल्ह्यात. अतिवृष्टीच्या तडाख्याने खरीप सोयाबीन,तूर या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.असतानाही जिल्ह्यात फक्त एकाच मंडळाला पीकविमा मंजूर झाल्याने शेतकरी वर्गामध्ये संतापाची लाट उसळली आहे. एकीकडे नुकसानीने कळस गाठला आणि शासनासह पीकविमा कंपनीने पुसली शेतकऱ्यांच्या तोंडाला पान. मागील वर्षी केंद्र सरकारने प्रधानमंत्री पीकविमा योजनेत शेतकऱ्यांवर अन्यायकारक मोठे बदल केले. त्यानुसार वैयक्तिक पातळीवर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आता नुकसान भरपाई मिळत त्या उलट गाव मंडळावर आधारित उंबरठा उत्पन्न त्याच बरोबर 'मागील पाच वर्षांची सरासरी' हा आधार घेऊन एक किमान उत्पादन स्तर ठरवला जातो.आणि त्यापेक्षा कमी उत्पादन झाल्यास विमा कंपनी नुकसान भरपाई देते.या अन्याय कारक निकषामुळे यावर्षी जिल्ह्यातील खरीप पिके पुरते हातची गेले.शेतकऱ्यांना आशा होती प्रधानमंत्री पिकविम्यची मात्र पिकविम्याने शेतकऱ्यांच्या तोंडाला पानेच पुसली आहेत.

### योजनेचे नावमोठे लक्षण खोटे, शेतकऱ्यांची भावना !

प्रधानमंत्री फसल बीमा योजना नाव शासनाने नाव मोठे आणि आकर्षक ठेवले मात्र नावाप्रमाणे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळत नसल्याने योजनेबद्दल हजारो शेतकर्यांनी आपला रोष व्यक्त केला आहे. शेतकरी म्हणतात एवढी अतिवृष्टी होऊनही जर मदत मिळत नसेल तर शासन फक्त शेतकऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या हिस्यापोटी वसुली करत असल्याचाही आरोप शेतकरी वर्गातून होत आहे.

# जिल्ह्याचा पिक विमा योजनेत समावेश करा - आ.सईताई डहाके

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●



पिक विमा योजनेत वाशिम जिल्ह्याचा समावेश करण्यात यावा अशी मागणी कारंजा मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके यांनी राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

राज्य शासनाच्या पिक विमा योजनेत वाशिम जिल्हा वगळण्यात आलेला आहे,ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.वाशिम जिल्हा हा प्रामुख्याने कृषिप्रधान जिल्हा असून येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक आपत्ती,अवकाळी पाऊस,दुष्काळ,कीड व रोग यांच्या संकटांना सामोरे जात आहेत.अशा परिस्थितीत पिक विमा योजना ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आधारव्यवस्था आहे.मात्र या योजनेतून वाशिम जिल्हा वगळल्यामुळे येथील शेतकरी आर्थिक संरक्षणापासून वंचित राहत आहेत.यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढत असून त्यांच्यावर मोठा अन्याय होत आहे.या संदर्भात आपण तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन पिक विमा योजनेत वाशिम जिल्ह्याचा समावेश करण्याबाबत आवश्यक ती सकारात्मक प्रतिसादाची कार्यवाही करावी असेही पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# बँक खातेदारांची पाण्यासाठी भटकंती !

## * हराळ येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेतील प्रकार *प्रशासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे

●दिपक मापारी @ रिसोड●





तालुक्यातील येत असलेल्या हराळ येथील दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखेत मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे चित्र समोर येत आहे. विशेषता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था बँकेत नसल्यामुळे खातेदारांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. रोजच्या व्यवहारासाठी बँकेत येणाऱ्या नागरिकांना तहान भागविण्यासाठी बाहेर भटकंती करावी लागते. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

बँक ही केवळ आर्थिक व्यवहाराची जागा नसून ती सार्वजनिक सेवा देणारी महत्त्वाची संस्था आहे. अशा ठिकाणी पिण्याच्या स्वच्छ पाण्यासारखी मूलभूत सुविधा नसणे म्हणजे व्यवस्थापनाच्या उदासीनतेचे घातक आहे. ग्राहक तासंतास रांगेत उभे राहतात परंतु त्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध होत नाही, ही वस्तुस्थिती व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. या संदर्भात बँक शाखा व्यवस्थापकाची पिण्याच्या पाण्याची जर खातेदारांची व्यवस्था नसेल तर त्यांचे खातेदाराप्रती उदासीनता दिसून येते बँकेच्या ठोस कारवाई होत नसल्याने अधिकारी निद्रिस्त अवस्थेत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झालेली आहे.

प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. पाण्याची सोय ही बँकेची जबाबदारी नाही का मानवी जीवनाला पाणीही मूलभूत गरज असताना त्यावर सातत्याने दुर्लक्ष होत आहे. संबंधित बँक व्यवस्थापकाने तात्काळ पावले उचलून पाण्याची समस्या कायमची मार्गी लावावी, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. सार्वजनिक संस्था केवळ सेवा देण्याचे आश्वासन न देता, त्या सेवांची प्रत्यक्ष अमलबजावणी करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा घटनांमुळे व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत येईल


तरी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या शाखा व्यवस्थापकांना पाण्याची कायमची व्यवस्था करण्याची आदेश द्यावे, अशी मागणी परिसरातील खातेदारांनी केली आहे.

# कारंजा-मानोरा तालुक्यातील ९९ गावातील पोलीस पाटीलाचे पद रिक्त !

## *शासन, अधिकाऱ्याचे दुर्लक्ष सर्वसामान्य जनतेचे हाल * काही गावात ८ ते १० वर्षापासून पदे रिक्त

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

कारंजा मानोरा तालुक्यातील ९९ गावातील पोलीस पाटलांचे पदे ८ ते १० वर्षापासून रिक्त असून या गावातील लोकांना शासनाच्या वअधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे.ज्या गावातील पोलीस पाटलाचे पद रिक्त आहेत त्या गावाचा पदभार दुसऱ्या गावाच्या पोलीस पाटलाला दिला आहे.काही गावांच्या पोलीस पाटलाचा पदभार त्या गावापासून ५ ते १० कि.मीटर अंतरावर असलेल्या गावाच्या पोलीस पाटलाला दिलेला आहे.त्यामुळे या गावातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.आणि शैक्षणिक कामात अडथळा येत असून काम होण्या वेळ लागत आहे.त्यामुळे शासनाने व अधिकाऱ्यांनी या विषयाकडे लक्ष देऊन लवकरात लवकर रिक्त पदे भरावी अशी मागणी होत आहे.पोलीस पाटील पदाची रिक्त असलेल्या गावाची नावे खालील प्रमाणे आहेत तारखेडा ता. कारंजा, कामठवाडा ता.कारंजा,जामदरा ता.मानोरा, डांगरगांव ता.मानोरा, मोखड पिंप्री ता.कारंजा,गलमगांव ता.मानोरा, दापुरा खुर्द ता.मानोर,कारपा ता.मानोरा, वढवी ता.कारंजा,वाईगौळ ता.मानोरा, पिलखेड ता.कारंजा,मंद्रा ता. मानोरा रंजीतनगर ता.मानोरा, शेदोना ता. मानोरा, वसंतनगर ता. मानोरा, गिराट ता.मानोरा खडा बु ता.कारंजा, चिस्ताळा ता.मानोरा, रतनवाडी ता.मानोरा, आमकिन्ही ता. मानोरा,वार्डा ता.मानोरा, उमरी बु ता.मानोरा,वसंतनगर (पो) ता.मानोरा, शेवती ता.कारंजा, सोमेश्वरनगर ता. मानोरा, उबडी खुदे ता.मानोरा, बोरव्हा इजारा ता.मानोरा,धानोरा भुसे ता. मानोरा कुपटा ता.मानोरा,पाळोदी ता. मानोरा, उमरी खु ता.मानोरा,कोंडोली ता. मानोरा, कारजा ता.कारंजा दादगांव




ता.कारंजा,गायवळ ता.कारजा,दिघी ता.कारंजा मुगूटपूर ता.कारंजा,नायणी ता.मानोर,इंझोरी ता.मानोरा कोळी ता. कारंजा,पिंप्री वरघट ता.कारंजा,कुपटी ता. कारंजा,बांबर्डा ता.कारंजा, रामतिर्थ ता. मानोरा, साखरडोह ता.मानोरा, हातना ता.मानोरा, हिंगणवाडी ता. कारंजा, लाडेगांव ता.कारंजा, रामटेक भेंडे ता.कारंजा, झोडगा ता. कारंजा, तुळजापूर ता. कारंजा,तांदळी ता. कारंजा विळेगांव ता.कारंजा,रोहणा ता. मानोरा, चांदई ता.कारंजा,चोंढी ता. मानोरा, गोस्ता ता.मानोरा,जांब ता. कारंजा वाकी ता.कारंजा,येवता ता. कारंजा, जनुना ता.कारंजा, सेवादासनगर ता. मानोरा, वटफळ ता.मानोरा,कारंजा ता.कारंजा, शेलु बु. ता. कारंजा,अंतरखंड ता. कारंजा, पसरणी ता.कारंजा मांडवा ता. कारंजा,पिंप्री ता. मानोरा,पोहा ता. कारंजा,खानापूर ता.कारंजा,पिंप्री मोडक ता.कारंजा, शिवनगर ता. कारंजा, सोयजना ता.मानोरा,किन्ही रोकडे ता. कारंजा,माहुली ता.मानोरा महागांव ता.कारंजा,वाल्हई ता. कारंजा,गंगापूर ता. कारंजा,पिंपळगांव खु.ता.कारंजा,मनभा ता.कारंजा लोहारा ता.कारंजा,गव्हा ता. मानोरा,धावंडा ता. मानोरा,जवळा बु ता.मानोरा,बेबळा ता. कारंजा, सोमठाणा ता. मानोरा, सोमनाथनगर ता. मानोरा, म्हसणी ता. मानोरा,रूद्राळा ता.मानोरा, किनखेड धा. ता कारंजा,धनज बु.ता. कारंजा, शिगणापूर ता. कारंजा, बालाजीनगर ता. मानोरा, उज्वलनगर ता.मानोरा,धामणी खडी ता. कांरजा, अजमपूरता. कांरजा, औरंगपूर ता. कारंजा, हातोली ता.मानोरा या गावातील पोलिस पाटलांचे पदे रिक्त आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# पातुर्डा येथील मुख्यररस्त्यावर स्पीड ब्रेकर धोकादायक

प्रतिनिधी ३० एप्रिल

**संग्रामपुर :** तालुक्यातील पातुर्डा येथील जिल्हा परिषद हायस्कूल ते आठवडी बाजार या सुमारे पाचशे मीटर रस्त्याचे काम कंत्राटी कंपनीने केले गावातील मुख्य रसत्यावर वाहनाची वर्दळ वाहतुक मोठ्या प्रमाण सुरु असते कांक्रीट रसत्याचे हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने १ महिण्यातच रस्ता उखडला मुख्य कांक्रीट रस्त्यावर जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय समोर असलेल्या स्पीड ब्रेकर धोकादायक वाहन चालकाना साठी डोकेदुखी ठरला आठवडी बाजार बसस्थानक कालव्यावरील तसेचनाल्याचे अर्धवट कामे केव्हा पुर्ण होणार असा प्रश्न नागरिकां कडून उपस्थित होत आहे



शासकिय कार्यालय शाळा ,रुग्णालय , वस्ती अपघात पवनस्थळी सुरक्षिततेसाठी स्पीड ब्रेकर संबंधीत कंत्राटदार कंपनी कडून बनवले जातात स्पीड ब्रेकरची उंची ३ ते ४ इंच रुंदी ३.७ मीटर तसेच स्पीड ब्रेकर वाहन चालकांना दुरुन दिसावे म्हणुन ओळखसाठी ब्रेकरवर पांढरे रंग काळे पट्टे असते परंतु जिल्हा परिषद विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय समोर कंत्राटी कंपनी करवी चुकीच्या पद्धतीने नियमाला केराची टोपली दाखवत मनमानीचा कळस गाठत मोठे उंची ब्रेकर बनवले त्यामुळे दुचाकी चारचाकी वाहन चालकासाठी धोकादायक तसेच त्रासदायक झाल्याने उंच ब्रेकर वाहन चालकांचे इंजिंनला लागुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही कंत्राटदार कंपनीच्या मनमानी मुळे वाहन चालकांचे नागरिकांना नाहक आर्थिक भुदंड सहन करावा लागत

## नाल्याचे अर्धवट कामे केव्हा पूर्ण होणार

आहे शासनाने खांडवी ते पंचगव्हाण दरम्यान च्या रस्ता सुधारण्याचे नाल्याचे काम गेल्या सात वर्षांपूर्वी हाती घेतले आहे आटो स्टॉफ माहेश्वरी रसत्यावर ऑटो स्टॉप जवळ बस स्थानक आठवडी बाजार वळण रसत्यावर नाली बाधकाम हे दिर्घकाळा पासून प्रलंबीत व रखडलेले आहे. साड पाणी वाहून नेणाऱ्या नाल्या अर्धवट असुन कित्येक दिवस होऊनही पुर्ण करायचा नाही हा फंडा कंत्राटी कंपनीने गिरवला आहे गेल्या अनेक दिवसापासून नाल्याचे काम अर्धवट करून काम सोडून देण्यात आलेले आहे अर्धवट नाल्याच्या ठिकाणी मोठे खडडे असल्याने या रस्त्याने येणारी जाणारी वाहनासाठी धोकादायक असुन अपघाताला निमंत्रणच आहेत सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक अर्धवट नाल्या या रस्त्याची तसेच नियमबाह्य स्पीड ब्रेकरची पाहणी करावी व कंत्राटी कंपनीला नाल्याचे कामे व स्पीड ब्रेकरची उंची कमी करण्याबाबत सुचना द्याव्या अशी ही मागणी पातुर्डा , कोद्री , टाकळी पंच कुंदेगाव, आवार , उकळी बु परिसरातील प्रवासी व विशेष पातुर्डा ग्रामस्थां कडून जोर धरत आहे.

# पत्रकाराचा अपमान करणाऱ्या आमदार संजय गायकवाडांचा तीव्र निषेध

प्रतिनिधी ३० एप्रिल

♦ 'मेडिटेशन सेंटर'मध्ये पाठवण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**खामगाव :** लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेचा आणि पत्रकारांचा वारंवार अवमान करणाऱ्या बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात पत्रकार आक्रमक झाले आहेत. बुलढाण्याचे पत्रकार वसीम शेख यांच्याशी केलेल्या असभ्य वर्तनाचा निषेध करत, गायकवाड यांना मानसिक शांतीसाठी 'मेडिटेशन सेंटर'मध्ये पाठवण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन बुलढाणा जिल्हा टीव्ही अँड डिजिटल मीडिया जर्नलिस्ट असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

मंगळवारी बुलढाण्यात आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात आंदोलन पार पडले. एका पुस्तक प्रकाशकाला दिलेल्या धमकीच्या प्रकरणी हे आंदोलन करण्यात आले होते. दरम्यान, पत्रकार परिषदेत आपली बाजू मांडत असताना पत्रकार वसीम शेख यांनी विचारलेल्या प्रश्नावर संयम राखण्याऐवजी आमदारांची भाषा घसरली. त्यांनी संबंधित पत्रकाराला 'तू कच्च्या डोळ्यांचा आणि कच्च्या कानाचा आहेस' अशा शब्दांत हिणवून संपूर्ण पत्रकारितेचा अवमान केला. या घटनेमुळे जिल्हाभरातील पत्रकारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्हा टीव्ही अँड डिजिटल मीडिया जर्नालिस्ट असोसिएशनच्या वतीने जिल्हाभर निषेध नोंदवून निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार खामगाव येथे तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आमदार संजय गायकवाड हे लोकप्रतिनिधी असूनही सातत्याने आक्रमक व अपमानास्पद भाषा वापरत असल्यामुळे सामाजिक वातावरण दूषित होत आहे. पत्रकारांना प्रश्न विचारण्यापासून रोखणे व त्यांचा अपमान करणे हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे कृत्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच, आमदारांच्या वर्तनात सतत चिडचिड व आक्रमकता दिसून येत असल्याने त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी शासनाने त्यांना तातडीने एखाद्या ध्यान केंद्रात पाठवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# 'गो सन्मान आव्हान अभियान' अंतर्गत शेगावात रॅली

प्रतिनिधी ३० एप्रिल

♦ तहसीलदारांना निवेदन ♦ कत्तलखान्यांचे परवाने रद्द करण्याची मागणी

**शेगाव :** मुख्य संरक्षक लक्ष्मण पोधाता व अध्यक्ष चंडी बाबा (वृष) यांच्या प्रेरणेने २७ एप्रिल २०२६ रोजी येथे 'गो सन्मान आह्वान अभियान' अंतर्गत भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. महामंडलेश्वर दिदी सत्यप्रियाजी यांनी गौमाता व वासरासह तहसील कार्यालयाकडे पायी चालत जाऊन या रॅलीत सहभाग नोंदविला. मोठ्या संख्येने भाविक व नागरिक उपस्थित राहिल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

रॅलीदरम्यान 'गोमातेचा सन्मान करा', 'गोसंरक्षण हेच राष्ट्रसंरक्षण' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सहभागी नागरिकांनी फलक व बॅनरच्या माध्यमातून गोसंवर्धनाबाबत जनजागृती केली. समाजात गोसंरक्षणाची जाणीव निर्माण करणे आणि शासनापर्यंत जनतेच्या भावना पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. यावेळी मा. तहसीलदार यांच्या माध्यमातून मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात महाराष्ट्राची संतपरंपरा, सांस्कृतिक वारसा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'गो-ब्राह्मण प्रतिपालक' या आदर्शाचा उल्लेख करत गोसंरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. गायी केवळ श्रद्धेचे प्रतीक नसून ग्रामीण अर्थव्यवस्था, शेती व्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्याचा कणा असल्याचे नमूद करण्यात आले. रासायनिक शेतीऐवजी नैसर्गिक व गो-आधारित शेतीकडे वळल्यास राज्य आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल व भावी पिढ्यांना शुद्ध अन्न मिळेल, असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये राज्यातील सर्व कत्तलखान्यांचे परवाने रद्द करणे, गोतस्करी व गोहत्येविरोधात कठोर कायदे करणे, पंचगव्य संशोधनाला प्रोत्साहन देणे, प्रत्येक ग्रामपंचायतीत नंदीशाळा व जिल्हास्तरावर गो-अभयारण्य स्थापन करणे, महामार्गांवर जनावरांसाठी रुग्णवाहिका व ट्रॉमा सेंटर उभारणे, शालेय अभ्यासक्रमात 'गोविज्ञान' विषयाचा समावेश करणे, तसेच चारा व चराई व्यवस्थेसाठी सक्षम धोरण राबविणे अशा मागण्यांचा समावेश आहे. अपघात, पॉलिथिन सेवन, कुपोषण आणि तस्करीमुळे जनावरांवर येणाऱ्या संकटांचा उल्लेख करत गोसंरक्षणासाठी एकात्मिक केंद्रीय कायदा व स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याची तसेच देशी गायींना 'राष्ट्रमाता/राज्यमाता' दर्जा देण्याची मागणीही करण्यात आली आहे. मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत महाराष्ट्रात गोसंरक्षणाचे सुवर्णयुग पुन्हा येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय मुंबई तसेच तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या.

# चारचाकी वाहनाची रस्त्याच्या कडेला झाडाला धडक प्रवाशी बालबाल बचावले

प्रतिनिधी ३० एप्रिल

**संग्रामपुर:** तालुक्यातील पातुर्डा फाटा ते गाव रसत्यावर भरदाव वेगाने चारचाकी वाहन पंचर झाल्याने ड्रायव्हरचे नियंत्रण सुटल्याने रसत्या वरुन झाडावर आढळली यात ४ प्रवाशी जखमी झाल्याची घटना दुपारी साडेबारा वाजता घडली

याबाबत थोडक्यात हकिकत असे प्रकारे आहे कि पातुर्डा फाट्यावरून पातुर्डा गावाकडे येत असतांना पातुर्डा फाटा ते पातुर्डा गाव दरम्यान चारचाकी वाहनाचा पुढचा चाक पंमचर झाल्याने वेगात असलेले वाहन बरास मध्ये घुसुन झाडाला धडक दिल्याने झाड उन्मळून पडले त्यात ५ प्रवाशी जखमी झाले सदर घटना स्थळी पातुर्डा येथील मजुर व युवकांनी वाहनात अडकलेल्या प्रवाश्यांना बाहेर काढले व शासकीय रूग्णवाहिकेला दुरध्वनी व्दारे कळविल्यानंतर सदर रूग्णवाहिका आल्यावर पातुर्डा ग्रामस्थांनी रुग्णवाहिके मध्ये जखमीना टाकुन शेगाव सईबाई रुग्णालयात उपचारासाठी हलविले जखमीचे सर्व जखमी व्यक्ती निमगाव येथील असल्याचे घटना स्थळी चर्चे वरुन समजले वृत लिहे पर्यंत अपघात ग्रस्त व्यक्तीचे नाव समजु शकले नाही

# बागेश्वर महाराजांच्या विधानाचा काँग्रेसकडून निषेध

प्रतिनिधी ३० एप्रिल

**मोताळा :** बागेश्वर महाराजांकडून बेताल वक्तव्य करुन जनतेमध्ये संभ्रम पसरवून समाजात गैरसमज पसरवून सामाजिक सलोखा बिघडवण्याची शक्यता असल्यामुळे त्यांच्या विधानाचा निषेध करून तालुका काँग्रेस कमेटीकडून २८ एप्रिल रोजी तहसिलदार करण्यात आला. निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की, कोणत्याही महाराजांनी सार्वजनिक स्वरुपात बोलतांना सामाजिक सलोखा कायम राहून कुणाच्याही भावना दुखावून दोन समुदायांमध्ये संघर्ष निर्माण होणार नाही याची खबरदारी घेण्याची गरज असतांना सध्या राज्यात आलेल्या बागेश्वर बाबांनी छत्रपती शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांच्याविषयी कल्पोकल्पीत विधान करुन जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे कार्य केलेले आहे. त्यांच्या या वक्तव्याचा तालुका काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष प्रविण कदम यांच्या नेतृत्वाखाली २८ एप्रिल रोजी तहसिलदार मोताळा यांना निवेदन देवून महाराजांचय वक्तव्याचा निषेध केला व त्यांच्या कृत्याला जाहीर विरोध दर्शवला. यावेळी शहरामधून मोर्चा काढून निषेध करण्यात आला. यावेळी जिल्हा कार्यकारीणी सदस्य मा. कृ. उ. बा. सभापती गणेशराव पाटील, मा. पं. स. सभापती संजय किनगे तालुका अध्यक्ष प्रविण कदम, मा. सभापती मिलींद जैस्वाल, मा.जि.प. सदस्य महेंद्र गवई, सरपंच श्रीकृष्ण खराटे, जयंत चोपडे, विलास पाटील, रऊफशेट, नितू राजपूत, अबीद कुरेशी, अभिषेक खराटे, शेख बशीर, भिकाजी घोंगडे, कैलासराव जवरे, भास्कर आघाव, विकास उजाडे, आकाश गरुड, शेख वशीम यांच्यासह अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेगांव येथील कृषी सेवा केंद्र बंद

प्रतिनिधी ३० एप्रिल

♦ प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले !

**शेगांव :** कृषी केंद्र चालक व विक्रेते संघटनांच्या आवाहनाला प्रतिसाद देते शहरात सोमवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. जिल्ह्यातील विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वैधण्यासाठी बुलढाणा जिल्हाभर बेमुदत आंदोलनाची हाक देण्यात आली असून, त्यांचा प्रभाव शेगांव येथे स्पष्टपणे दिसून आला.

सोमवारी सकाळपासून शहरातील बहुतांश सर्वच कृषी सेवा केंद्रे पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. त्यामुळे खत, बियाणे व कीटकनाशक खरेदीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला. अनेक ठिकाणी शेतकरी परत फिरताना दिसून आले. संघटनांच्या माहितीनुसार, रासायनिक खतांवरील डीलार मार्जिन वाढविणे, खत पुरवठा विना लिंकिंग' सुलभ करणे, अनधिकृत एचटीबीटी बियाण्यांच्या विक्रीवर बंदी घालून संबंधितांवर फौजदारी कारवाई करणे, या प्रमुख मागण्या आहेत. तसेच 'सारथी पद्वारे बियाणे व कीटकनाशक विक्रीची सक्ती व्यवहार्य नसल्याचा आरोप करत, ती रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, नियमांनुसार सीलबंद कृषी निविष्ठा विक्रीनंतरही कृषी केंद्रांवर दाखल होणाऱ्या गुन्ह्यांना विरोध दर्शविण्यात आला आहे. नवीन सीड ॲक्ट व कीटकनाशक कायद्यातील जाचक तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचीही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. संघटनांच्या वतीने इशारा देण्यात आला. आहे की, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर आंदोलन आणखी तीव्र केले जाईल. दरम्यान, बुलढाणा जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही या बंदला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले.

**कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले...**

तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले यावेळी ज्ञानेश्वर इंगळे, गजानन बुच, अरुण मोहता, भूषण पारस्कर, संदिप गणगणे, प्रतीक ढगे, सोनू अग्रवाल, आनंद धानुका प्रतिक टावरी यासह तालुक्यातील कृषी केंद्राचे संचालक यावेळी हजर होते.

# शेगाव येथे श्री गुरुदेव बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी ३० एप्रिल

**शेगाव :** येथील राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज आश्रम शेगाव यांच्या वतीने श्री गुरुदेव बाल सुसंस्कार शिबिर चे आयोजन २ मे शनिवार ते १२ मे मंगळवार असे एकूण १० दिवस पर्यंत आयोजन केले आहे यामध्ये १२ ते १८ वर्षे वयोगटांमध्ये मुलांचे निवासी आणि मुलींचे अनिवासी शिबिर चे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरास सहभाग घेणाऱ्या शिबिरार्थ्यांनी त्यांनी पूर्व नोंदणी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज आश्रम सेवाभावी ट्रस्ट शेगाव अळसणा येथे करून सहभाग घ्यावा असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. बाल सुसंस्कार शिबिरामध्ये दैनंदिनी पहाटे ४.३० वा जागृती प्रातःस्मरण सामुदायिक ध्यान, पहाटे ५.४५ वा परिसर स्वच्छता व श्रमदान गोसेवा, सकाळी ६.४५ वा ध्यान प्राणायाम सूर्यनमस्कार, सकाळी ७ वा अल्पोपहार, सकाळी ८ वा लाठीकाठी जुडो कराटे लेझीम, सकाळी ९ वा बौद्धिक, सकाळी ११ वा भजन संगीत, ११.३० वा भोजन, दुपारी १२ वा विश्रांती, १ वा भजन संगीत श्लोक, दुपारी ३ वा अल्पोपहार, दुपारी ४.३० वा सामुदायिक प्रार्थना, संध्या ६ वा मान्यवरांचे मार्गदर्शन, ६.३० वा विविध विषयावर चर्चा, रात्री ७.३० वा भोजन, ८.३० वा राष्ट्र वंदना, रात्री ९.३० वा राष्ट्रवंदना पूर्व प्रार्थना व विश्रांती असे एकूण १० दिवस दैनंदिन दिनक्रम सहभागी शिबिरार्थ्यांचा राहील असे आयोजकांच्या वतीने कळवण्यात आले आहे.

# खामगाव शहरातील अति संवेदनशील भागात सीसीटीव्ही कॅमेरे वाढविण्याची गरज!

प्रतिनिधी ३० एप्रिल

**खामगाव :** शहरातील प्रमख चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत; मात्र काही अतिसंवेदनशील भागात या कॅमेऱ्यांची संख्या वाढविणे गरजेचे बनले आहे. अशातच काही ठिकाणी कॅमेरे बंद, तांत्रिक बिघाड असल्याने सुरक्षेसाठी बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे आता केवळ शोभेची वस्तू ठरत आहेत का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. गुन्हा घडल्यानंतर पोलिसांकडून सर्वप्रथम सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जाते; मात्र प्रत्यक्षात हे फुटेज मिळवणे, त्याचे विश्लेषण करणे आणि त्यातून ठोस शहरातील प्रमुख रस्ते आणि बाजारपेठेसह अनेक वस्त्यांमध्ये सीसी कॅमेरे नसल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बस स्थानकातील आवार आणि बस स्थानकासमोरील परिसरातही प्रभावी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अभाव असल्याची ओरड आता यानिमित्ताने होते. खामगाव शहरातील जुने कॅमेरे बदलून नवीन बसविण्याची मागणी होत आहे. धागेदोरे मिळवणे यात प्रचंड वेळ जात आहे. अनेक वेळा कॅमेरे बंद असणे, फुटेज अस्पष्ट असणे किंवा तांत्रिक बिघाडामुळे आवश्यक पुरावे मिळत नाहीत. परिणामी, गुन्हेगारांचा माग काढणे कठीण ठरत आहे. शेगाव रोड, घाटपुरी नाका, सुटाळा, सजनपुरी आणि बाळापूर नाका परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी जोर धरत आहे. शहरापासून लांब असलेल्या वस्तीच चोरट्यांच्या रडारवर आहेत. अशा ठिकाणी पोलिसांची गस्त वाढविली जाते. मात्र, वेळेअभावी पोलिसांची गस्तही अपुरी ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**तपास थंड बस्त्यात !**

२७ जानेवारी रोजी वाडी येथे पडलेल्या दरोड्यासह अनेक घटनांचा तपास अद्याप रखडलेला आहे. सीसीटीव्ही फुटेज असूनही गुन्हेगारांपर्यंत पोहोचण्यात यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे.

# खामगावात खून प्रकरणातील आरोपींची धिंड

प्रतिनिधी ३० एप्रिल

**खामगाव :** शहरातील बर्डे प्लॉट परिसरात घडलेल्या खुनाच्या प्रकरणातील आरोपींना आज पोलिसांनी घटनास्थळी नेऊन धिंड काढली. यावेळी पोलिसांनी आरोपींकडून प्रत्यक्ष घटनाक्रम जाणून घेतला.

> **घटनास्थळी प्रात्यक्षिक देत उलगडला घटनाक्रम**

आरोपींनी खून कसा केला, कोणत्या ठिकाणी काय घडले, याचे सविस्तर प्रात्यक्षिक दाखवत पोलिसांना तपासासाठी महत्त्वाची माहिती दिली. दरम्यान, आरोपींना पाहण्यासाठी बर्डे प्लॉट परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. या प्रकाराबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता आणि कुतूहलाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पाडली. या प्रात्यक्षिकामुळे तपासाला अधिक गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आलेवाडी येथे झाले आरोग्य तपासणी शिबिर

प्रतिनिधी ३० एप्रिल

**संग्रामपूर:** तालुक्यातील आदिवासीबहुल परिसरात तील आलेवाडी ह्या गावात आदिवासी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने रविवार दिनांक २६ एप्रिल रोजी भव्य आरोग्य शिबिर संपन्न झाले ह्या शिबिरात आदिवासी पट्ट्यातील वसाडी चीचारी सायखेडा निमखेडी आणि आलेवाडी आधी गावातील शेकडो नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आला.

आलेवाडी येथे संपन्न झालेल्या या आरोग्य शिबिरात डॉ. धनंजय मारोडे जळगाव जा, डॉ.दुर्गेश माळोदे जळगाव जा. डॉ. अमोल धूर्डे वरवट बकाल. डॉ. सुरज पाटकर शेगाव. डॉ. प्रफुल वाघाडे अकोला. डॉ. दिनेश गांधी जळगाव जा. डॉ. मनोज तायडे संग्रामपूर. डॉ. मोबीन वरवट बकाल. डॉ.शाहरुख सुरत्ने वसाडी. आधी तज्ञ



डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून औषधोपचार केला. आदिवासी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी तथा अध्यक्ष कासम सुरत्ने उपाध्यक्ष इमाम केदार गंगुबाई केदार आधी पदाधिकाऱ्यांनी ह्या शिबिराचे आयोजन केले होते संस्थेचे अध्यक्ष कासम सुरत्ने यांनी सुरुवातीला आदिवासींचे आराध्य दैवत शबरी माता तंट्या मामा व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांना अभिवादन पुढे बोलताना सांगितले की , आरोग्य हेच खरे धन आहे असे आपल्या पूर्वजांनी सांगितले आहे मनुष्याच्या जीवनात पैसा संपत्ती मानसन्मान यांना महत्त्व असले तरी उत्तम आरोग्य शिवाय या सर्व गोष्टी निरर्थक ठरतात म्हणजेच प्रत्येक व्यक्तीने आपले आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे या आरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना विविध आजाराची तपासणी योग्य सल्ला औषध उपचार आणि आरोग्य विषयी जनजागृती केली जाणार आहे अशा शिबिरामुळे समाजातील गरजू आणि दुर्बल घटकांना मोठा लाभ होतो समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचण्याच्या उद्देशाने आदिवासी बांधवांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी महिला व बालकांचे आरोग्य परीक्षण तसेच आवश्यक औषधींचे मोफत वाटप करण्यात येणार आहे दुर्गम आणि वन क्षेत्रातील अनेक आदिवासी कुटुंबांना वेळेवर सेवा मिळणे कठीण जाते ही गरज लक्षात घेऊन तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे विशेषत: ग्रामीण भागात आणि सर्व सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्यासाठी अशा शिबिराचे महत्त्व अन्य साधारण आहे आज येथे उपस्थित डॉक्टर हे निस्वार्थ भावनेने सेवा देत आहे त्यांचे मनपूर्वक आभार मानतो या उपक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे आरोग्याबाबत जनजागृती करणे व निरोगी समाज घडविण्यात हातभार लावणे हा होय व शासनाच्या आरोग्य विषयक सुविधांचा लाभ कसा घ्यावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले संस्थेच्या वतीने आगामी काळात विविध सेवाभावी उपक्रम सुरू करण्यात येत असून त्याला आपल्या आदिवासी बांधवांनी मोलाचे सहकार्य करावे असे आवाहन केले. या आरोग्य शिबिराला खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष विश्वासराव वरणकार हे अध्यक्ष होते आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की आदिवासींसाठीच्या विविध योजना राबविण्यात अग्रेसर असणाऱ्या आदिवासी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून ह्या परिसरातील गरजू नागरिकांनी शासकीय योजनेचा आणि आरोग्य विषयक सुविधांचा पुरेपूर लाभ घ्यावा आदिवासी भागात एक चांगली संस्था काम करीत असून या संस्थेचे च्या अध्यक्षाचे त्यांनी आपल्या भाषणातून गौरव केला.

# ट्रकची दुचाकीला धडक पती-पत्नी ठार

प्रतिनिधी ३० एप्रिल

**खामगाव :** अकोला रोडवरील टेंभूर्णा शिवारातील सुदर्शन ढाब्यासमोरून २७ एप्रिल रोजी दुपारी ५ वाजताच्या सुमारास अतुल बाबुराव सिरसाठ वय ३२ व दिक्षा अतुल सिरसाठ वय २८ दोघे रा. मातोडी ह. मु. खडकी अकोला दुचाकी क्र. एमएच ३० - बीवाय ०९३२ ने अकोलाकडे जात होते. दरम्यान ट्रक क्र. एमएच ०९-एचएच ५९८४ च्या चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक दारूच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून दुचाकीला पाठीमागून धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार अतुल बाबुराव सिरसाठ व दिक्षा अतुल सिरसाठ या पती - पत्नीचा जागीच मृत्यू झाला. तसेच दुचाकीचे नुकसान झाले. याप्रकरणी शांताराम नारायण इंगळे यांनी खामगाव ग्रामिण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त ट्रक चालकाविरुध्द कलम २८५, १०६(१) भान्यासं, सहकलम १८५ मोवाका नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॉ बाळकृष्ण फुंडकर करीत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जे भरतात आयकर, त्यांना नाही मिळणार रेशनची भाकर




प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला :** सरकार तर्फे राज्यात अंत्योदय, दारिद्र रेषेखालील व्यक्ती तसेच प्राधान्य गटातील नागरिकांना दरमहा मोफत धान्य दिले जाते परंतु या योजनेतही अनेक नागरिक असे आहेत की जे आयकर भरतात. या योजनेतील धन दांडग्यांना वगळण्यासाठी शासनाच्या नव्या नियमानुसार जे लोक आयकर भरतात त्यांना रेशन कार्डचा लाभ घेता येणार नाही यानुसार जिल्हा पुरवठा शाखेकडून कारवाईला सुरुवात होणार आहे जिल्ह्यातील आयकर दात्यांची नावे शिधापत्रिकेतून वगळण्यात येतील या वगळण्यात आलेल्या आयकरदात्यांच्या केशरी किंवा पिवळ्या शिधापत्रिका आता पांढऱ्या केल्या जातील आयकर भरणाऱ्या व्यक्तींना रेशन कार्डाचा लाभ घेता येणार नाही कारण स्वस्त धान्य दुकानांमधून त्यांनी धान्य घ्यावे यासाठी ते पात्र नाहीत त्यामुळे राज्य सरकारने हा निर्णय घेतला असून त्यांच्या ऐवजी जे खरोखर गरजू आहेत व ज्यांचे एकूण उत्पन्न कमी आहेत अशा व्यक्ती कुटुंबांना रेशन कार्डचा लाभ दिल्या जाईल ही प्रक्रिया जिल्हास्तरावर राबविली जाईल तशा सूचनाही जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाले असून जिल्हा पुरवठा विभागाकडून गरजूंना नव्या शिधापत्रिका दिल्या जात आहेत यानुसार मागील दोन ते तीन महिन्यांपासून जिल्हा पुरवठा विभागाकडून पडताळणी करून नावे कमी करणे तसेच शिधापत्रिका वर्ग करण्याची प्रक्रिया राबवली जात आहे बहुतांश आयकर दाते केशरी पिवळी शिधापत्रिका धारक सुद्धा असल्याचे आढळून आले आहे त्यामुळे त्या शिधापत्रिका आता पांढऱ्या केल्या जातील. आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पुरवठा शाखेतर्फे तपशिलाची पडताळणी करून कार्यवाही केली जाईल त्यामुळे लवकरच जे लोक आयकर भरतात त्यांना रेशन कार्डचा लाभ घेता येणार नाही.

### जिल्ह्यात लवकरच होईल कारवाईला सुरुवात

अकोला जिल्ह्यातील जे शिधापत्रिका धारक आयकर दाते आहेत त्यांच्यावर ही कारवाई केली जाईल आतापर्यंत अनेक व्यक्तींची नावे रेशन कार्डातून कमी करण्यात आली आहेत तसेच हजारो करदात्यांच्या शिधापत्रिका पांढरे केल्या जातील जोपर्यंत सर्व आयकर दात्यांची नाव पडताळणी पूर्ण होत नाही तोपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे

## अकोल्यात कमाल तापमान ४४.२ अंश सेल्सिअस

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला :** शहरात उन्हाचा प्रकोप पाहायला मिळत असून बुधवारी कमाल तापमान ४४.२ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. वाढत्या तापमानामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अकोला शहरात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आज शहरात कमाल तापमान ४४.२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवरची वर्दळ कमी झाली असून नागरिक अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे टाळत आहेत. उष्णतेमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्ग सर्वाधिक त्रस्त असल्याचे चित्र दिसून येत आहे.डॉक्टरांनी उष्माघाताचा धोका लक्षात घेता भरपूर पाणी पिणे, डोक्यावर टोपी किंवा कॉटन दुपट्टा वापरणे आणि शक्यतो दुपारच्या उन्हात बाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. दरम्यान, प्रशासनाकडूनही नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आज लाडक्या बहिणींना शेवटची संधी

◆ ई-केवायसी दुरुस्त न केल्यास मिळणार नाही लाभ

प्रतिनिधी ३० एप्रिल



**अकोला :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीन योजने'त नाव नोंदणी केलेल्या महिलांसाठी खूपच कमी वेळ शिल्लक आहे. जिल्ह्यातील जवळपास हजारो महिलांच्या ई-केवायसीमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत, ज्या दुरुस्त करण्यासाठी पूर्वी ३१ मार्चपर्यंतची मुदत देण्यात आली होती. या कालावधीतही मोठ्या संख्येने महिलांची ही केवायसी करणे बाकी असल्याने सरकारने २ एप्रिल रोजी आणखी एक आदेश जारी करून अंतिम मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवली होती. ही शेवटची संधी मानली जात आहे. यानंतर दुरुस्तीसाठी कोणतीही संधी मिळण्याची शक्यता नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्या महिलांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आपले ई-केवायसी पूर्ण केले नाही, त्यांचे योजनेचे लाभ आधीच थांबवण्यात आले आहेत. अशा लाभार्थ्यांना लाभ पुन्हा सुरू करण्याची शक्यता खूपच कमी आहे. अकोला जिल्ह्यात या योजनेअंतर्गत लाखो लाभार्थी आहेत. मोठ्या संख्येने महिलांचे ई-केवायसी प्रलंबित आहेत किंवा एक केवायसी केल्यानंतर त्रुटी आढळल्यामुळे त्याची पूर्तता करण्यासाठी महिला आणि बाल विकास कार्यालयाबाहेर दररोज लांबच लांब रांगा दिसत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ज्या महिलांचे ई-केवायसी चुकीचे होते आणि ज्यांनी ते वेळेत दुरुस्त केले आहे, केवळ त्याच महिलांना लाभ पुन्हा मिळू शकतील. महिला 'आपले सरकार' ई-सेवा केंद्र, त्यांच्या मोबाईल फोनवरून किंवा जवळच्या इंटरनेट कॅफेमधून ही प्रक्रिया पूर्ण करू शकतात. जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकाऱ्यांनी महिलांना आवाहन केले आहे की, त्यांनी ३० एप्रिल २०२६ पर्यंत आपले ई-केवायसी अद्ययावत करावे, जेणेकरून त्यांना कोणत्याही त्रासाशिवाय योजनेचा लाभ मिळत राहील. अन्यथा महिलांना या योजनेपासून वंचित रहावे लागेल.

# समर्थ गॅस एजन्सी मध्ये पैसे भरलेल्या ग्राहकांना सिलेंडर द्यावे

◆ शिवसेना शिंदे गटाने दिले जिल्हाधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधी ३० एप्रिल

**अकोला :** ग्राहकांना वेळेवर सिलेंडर न देणे तसेच सतत गॅस एजन्सी बंद ठेवणे या कारणामुळे अकोला शहरातील समर्थ गॅस एजन्सीवर कारवाई करण्यात आली होती. परंतु कारवाईच्या पूर्वी ज्या ग्राहकांनी गॅस सिलेंडर करिता पैसे भरले त्यांना अद्याप सिलेंडर तसेच पैशाचा मोबदला न मिळाल्याने आज शिवसेना शिंदे गटाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

अकोला शहरातील डाबकी रोड भागात असलेल्या समर्थ गॅस एजन्सी बाबतच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाचा प्राप्त झाल्या होत्या, त्याच अनुषंगाने समर्थ गॅस एजन्सी बंद झाली आहे. परंतु ज्या ग्राहकांनी समर्थ गॅस एजन्सी येथे सिलेंडर घेन्या करीता ऑनलाईन पावत्या फाडल्या त्यांना अद्याप गॅस सिलेंडर मिळाला नसल्याने आज शिवसेना शिंदे गटा तर्फे जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. अकोला जिल्ह्यात गॅस एजन्सी धारक मनमानी कारभार करत आहेत. याबाबतचे वृत्त आरआरसी न्यूजने प्रकाशित केले होते, त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने गॅस एजन्सीवर तात्काळ करावी असे निर्देश गॅस कंपनीला दिले होते. समर्थ गॅस एजन्सीवर कारवाई करीत त्यामधील कार्डधारकांना अकोला शहरातील चार एजन्सी मध्ये वळते करण्यात आले होते, परंतु कारवाईच्या पूर्वी ज्या ग्राहकांनी समर्थ गॅस एजन्सी मध्ये गॅस सिलेंडर साठी ऑनलाईन पावत्या फाडल्या त्या ग्राहकांना अद्याप गॅस सिलेंडर तसेच त्यांच्या पैशाचा मोबदला मिळाला नसल्याने आज शिवसेना शिंदे गटाच्या वतीने जिल्हाधिकारी निवेदन देण्यात आले. गॅस एजन्सी मधील ग्राहकांचा मोबदल्याचा पैसा तात्काळ परत करावा किंवा त्यांना गॅस सिलेंडर उपलब्ध करून द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनता भाजी बाजार परिसरातून गावठी पिस्तुलसह आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ३० एप्रिल



**अकोला :** शहरातील गजबजलेल्या जनता भाजी बाजार परिसरात गुन्ह्याच्या उद्देशाने गावठी पिस्तुल बाळगणाऱ्या एका इसमाला सिटी कोतवाली पोलिसांनी रंगेहाथ अटक केली आहे. त्याच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

३० एप्रिल २०२६ रोजी सिटी कोतवाली पोलिसांच्या डी.बी. पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एक इसम स्वतःजवळ बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगून शरीरविषयक गुन्हा करण्याच्या उद्देशाने जनता भाजी बाजार परिसरात उभा आहे. या माहितीची खातरजमा करून वरिष्ठांच्या आदेशानुसार पोलिसांनी सापळा रचला आणि आरोपीला ताब्यात घेतले.अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव समीर खान हसन खान (वय ३३ वर्ष, रा. मुझफरनगर, न्यु बैतुपुरा, अकोला) असे आहे. पोलिसांनी त्याच्याकडून खालील मुद्देमाल जप्त केला आहे:

या प्रकरणी फिर्यादी महेंद्र म. बहादूरकर यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियमाच्या कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय गवई, ए.एस.आय. महेंद्र बहादूरकर, अश्विन शिरसाठ, ख्वाजा शेख, किशोर येउल, शैलेश घुगे आणि अमोल गायकवाड यांनी यशस्वीरित्या पार पाडली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय कृष्णराव जाधव करत आहेत.


## शंकर नगर, बापू नगर भागाला गढूळ पाणी पुरवठा

**अकोला :** शहरातील अकोट फाइल, शंकर नगर, बापूनगर, दुबेवाडी, चिखलपुरा भागाला गढूळ पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे त्या परिसरातील रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच जनतेच्या आरोग्याशी चाललेला खेळ त्वरित थांबवावा अशी मागणी आहे. गढूळ तसेच घाण वास असणाऱ्या पाण्याचा पुरवठा केला जातो. या बाबतीत महापालिका जलप्रदाय विभागाला कळवले. परंतु फार फरक पडला नाही. ही समस्या का निर्माण झाली याची पाहणी करावी तसेच जनतेला शुद्ध पाणी पुरवठा होईल यास प्राधान्य द्यावे अशी मागणी नागरिक करीत आहेत. हा प्रश्न गांभीर्याने घेतला नाही तर आंदोलन करू असा इशारा त्या त्या भागातील रहिवासी देत आहेत.

# बाळापूर नदीकाठावर बिबट्याचे दर्शन

◆ तामसी परिसरात शेतकऱ्यांमध्ये भीती

प्रतिनिधी ३० एप्रिल




**बाळापूर :** तालुक्यातील तामसी परिसरात मन नदीच्या काठावर बिबट्या दिसल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्राप्त माहितीनुसार, तामसी येथील एक शेतकरी बुधवारी सकाळी शेतात जात असताना नदीकाठच्या दाट झाडीतून अचानक बिबट्या बाहेर पडल्याचे त्यांना दिसले. ही माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. सध्या शेतशिवारात पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू असल्याने सकाळच्या वेळेत शेतकरी व मजूरांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. अशा वेळी बिबट्याचा मुक्त संचार दिसून येत असल्याने संभाव्य धोका वाढला आहे. यापूर्वीही तामसी, चिंचोली आणि पिंपळगाव परिसरातील शेतशिवारात बिबट्याचे दर्शन झाल्याची माहिती समोर आली आहे. शेतकरी वनविभागाकडे बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी करीत आहे. वनविभागाने शोधमोहीम राबवली असली तरी अद्याप बिबट्याचा ठावठिकाणा लागलेला नाही. त्यामुळे अचानक हल्ल्याची शक्यता व्यक्त केली जात असून, एखादी दुर्दैवी घटना घडू नये यासाठी वनविभागाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आहे.

# गुरू शिष्य आता एकाच विचारधारेत आले

बच्चू कडू आणि मनोज पाटील यांचे आधीच ठरले होते का?

प्रतिनिधी ३० एप्रिल






**अकोला :** महापालिका निवडणुकी नंतर प्रहार जनशक्तीचे महानगर प्रमुख तथा बच्चू कडू यांचे खंदे समर्थक नगरसेवक मनोज पाटील शिवसेना शिंदे पक्षात आले. आणि आता माजी आमदार बच्चू कडू यांनी देखील शिवसेना शिंदे पक्षात प्रवेश केला आहे. मनोज पाटील ज्यांना राजकीय गुरू मानतात ते बच्चू कडू आणि मनोज पाटील यांचे एकाच विचारधारेचा अंगिकार करण्याबाबत पूर्वीच ठरले होते का अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे. नवीन राजकीय समीकरणे आकार घेत आहेत. या दृष्टीने माजी आमदार बच्चू कडू यांचा शिवसेना शिंदे पक्षातील प्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे. अकोल्याचे चार नगरसेवक शिंदे पक्षात गेले त्यात मनोज पाटील हे युवा तडफदार कार्यकर्ते देखील होते. मनोज पाटील ज्यांना राजकीय गुरू मानतात ते बच्चूभाऊ कडू शिवसेना शिंदे पक्षात आले आहेत. त्यामुळे बच्चू कडू आणि मनोज पाटील यांच्यात आधीच चर्चा झाली होती का तसेच राजकीय रणनीतीचा हा भाग आहे का अशी चर्चा सुरू आहे. नगरसेवक म्हणून मनोज पाटील प्रभावीपणे भूमिका बजावतांना दिसत आहेत. महापालिका सभातून ते छाप पाडत आहेत.





नगर परिषद, वाशिम
भूमिपुजन समारंभ
**कामाचे नांव** : १) वाशिम नगर परिषद जि. वाशिम आरक्षण क्र. ४२ येथे सर्वे नं. ५३४ मध्ये ॲम्पीथेटर उर्वरीत कामे, प्रदर्शनी हॉल उर्वरीत कामे, लहान मुलांचे खेळणे, EPDM फ्लोरींग करणे व वृक्षारोपन करणे व इतर नाविण्यपूर्ण कामे करणे **रक्कम** : १९९.६६ लक्ष रुपये
**योजनेचे नांव** : जिल्हा वार्षिक योजना (नाविण्यपुर्ण अनुदान)
**कामाचे नांव** : २) न.प.वाशिम अंतर्गत आरक्षण क्रमांक ४२ येथे वाहन तळ तयार करणे
**रक्कम** : ५२.७६ लक्ष रुपये **योजनेचे नांव** : महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान
**कामाचे नांव** : १)न.प.वाशिम अंतर्गत अकोला नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व छत्रपती शिवाजी महाराज चौक(बालाजी मंदिर जवळील) येथे नाविण्यपुर्ण काम करणे
**रक्कम** : १०१.३४ लक्ष रुपये
२) वाशिम नगर परिषद जि. वाशिम डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते शहर पोलीस स्टेशन पर्यंत दुभाजक येथे व पाटणी चौक येथे नाविण्यपुर्ण काम करणे **रक्कम** : ९८.०० लक्ष रुपये
**योजनेचे नांव** : जिल्हा वार्षिक योजना (नाविण्यपुर्ण अनुदान)
**कामाचे नांव** : १) न.प.वाशिम अंतर्गत सोहम बुट हाऊस ते जोहर गारमेंट पर्यंत डांबरी रस्ता व नाली सोबत दुभाजक बांधकाम, वॉल म्युरल व कुत्रिम विद्युत झाडे बसविणे (पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक)
**रक्कम** : १८१.४० लक्ष रुपये **योजनेचे नांव** : जिल्हा वार्षिक योजना (नागरी दलितेत्तर वसत्यांमध्ये सुधारणा)
२) न.प.वाशिम अंतर्गत आर.के.जनरल ते रौनक साडी सेंटर पर्यंत डांबरी रस्ता,नाली, ऑरनामेंटल पोल्स, वॉल म्युरल व वृक्षारोपण (पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक)
**रक्कम** : १००.०० लक्ष रुपये **योजनेचे नांव** : जनरल रोड फंड
शुभहस्ते
मा.ना.श्री दत्तात्रय विठोबा भरणे
कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री वाशिम जिल्हा
...विशेष उपस्थिती...
मा.श्री श्याम रामचरणजी खोडे
आमदार, वाशिम-मंगरुळनाथ विधानसभा मतदारसंघ
...प्रमुख पाहुणे...
मा.श्री संजय देशमुख
खासदार, वाशिम-यवतमाळ मतदारसंघ
मा.श्रीमती भावनाताई गवळी
आमदार, विधान परिषद
कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा.श्री अनिल माधवराव केंदळे अध्यक्ष, नगर परिषद वाशिम
गुरुवार, दि.३० एप्रिल २०२६
विनीत... श्री राजु विठोबा भांदुर्गे उपाध्यक्ष,नगर परिषद वाशिम श्री राहुल मोतीराम तुपसांडे बांधकाम सभापती,नगर परिषद वाशिम
हजारे वर्षा नामदेव, वाटाने अरुणा वसंतराव, इंगोले गोकुळाबाई रतन, हेडा कुणाल अशोक, काळे पूजा विशाल, ताजने अनिल नारायण, कल्ले करुणाबाई राजू, लोनसुने कासाबई मधुकर, खंडेलवाल पुजा विनोद, बढेल सोनू कन्हैया, गजानन काशीराम पाटील (दहात्रे), ठाकूर अंजली भानुप्रताप, श्रध्दा अमोल इंगोले, पुरण लालचंद बदलाणी, राठी नितेश(चिकु) सतीश, मंदाकिनी वैभवसिंग ढवळे, सतिश (गल्ला) वानखेडे, भालेराव पुजा राजरत्न, शेख रशीद शेख शहानुर, वाघमारे माया रुपेश, सारडा जयश्री कपिल, लांडगे गजानन प्रभाकर, वानखेडे जयश्री संतोष, राजु नामदेवराव वानखेडे, शे. खाजाबी सुरु, मुरकुटे संतोष पांडुरंग, अहमद शेहेनाजबी ज. झुल्फेखार, मिर्झा साबिर बेग मिर्झा सगीर बेग, गोरे कृष्णाताई कैलास, मडके नितीन चंद्रकांत, रेखा सुरेश मापारी, निलेश जयंतकुमार जीवनानी, गणेश प्रकाश खंडाळकर


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK